

पुणे : संत ज्ञानेश्वर महाराजांच्या पालखीने वारीचा सगळ्यात कठीण असा दिवेघाटाचा टप्पा बुधवारी पार केला. या वेळी वारकऱ्यांनी उन्हाची पर्वा न करता विठूनामाचा गजर करीत मार्गक्रमण केले. या आनंदवारीची छायाचित्रकार सुधीर नाझरे यांनी टिपलेली छबी.


रायगड, नवी मुंबई

# राम प्रहर

◆ वर्ष १५ ◆ अंक ३२७
www.ramprahar.com

गुरुवार, १५ जून २०२३ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २


# रायगडातील २५६ इमारती धोकादायक!

**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्याच्या शहरी भागातील धोकादायक इमारतींचे पावसाळापूर्व सर्वेक्षण पूर्ण झाले आहे. त्यानुसार २५६ इमारती धोकादायक असल्याचा निष्कर्ष प्रशासनाने काढला आहे. यातील ७३ इमारती अतिधोकादायक स्थितीत असल्याची बाब समोर आली आहे. हे लक्षात घेऊन धोकादायक आणि अतिधोकादायक इमारतींमधील रहिवाशांना सुरक्षितस्थळी स्थलांतरीत होण्याचे आदेश पालिका प्रशासनाने दिले आहेत.



**स्थलांतर करण्याचे नागरिकांना आदेश**

२४ ऑगस्ट २०२० रोजी महाड येथे इमारत कोसळून १६ जणांचा मृत्यू झाला. या दुर्घटनेत ४५ कुटूंबाचे संसार उघड्यावर आले होते. अतिवृष्टी आणि निकृष्ट दर्जाच्या बांधकामामुळे ही इमारत कोसळली होती. या दुर्घटनेची दखल घेऊन जिल्हा प्रशासनाच्या वतीने दरवर्षी पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर धोकादायक इमारतींचे सर्वेक्षण केले जाते.

जिल्ह्यातील सर्व नगरपालिका आणि नगरपंचायतींना धोकादायक इमारतींचे सर्वेक्षण करून अहवाल सादर करण्याचे निर्देश दिले होते. या ११ नगरपालिका आणि पाच नगरपंचायतींमधील सर्वेक्षण पूर्ण झाले आहे. यामध्ये जिल्ह्यात १८३ धोकादायक, तर ७३ अतिधोकादायक असल्याचे समोर आले आहे. या सर्व इमारतींमधील रहिवाशांना महाराष्ट्र नगर परिषद, नगरपंचायत अधिनियम १९६५च्या कलम १९५ अन्वये नोटीस बजावण्यात आल्या आहेत. यानुसार इमारतींमधील रहिवाशांना तातडीने सुरक्षितस्थळी स्थलांतरीत होण्यास सांगण्यात आले आहे.

**इमारतींची स्थिती**

| शहर | धोकादायक | अतिधोकादायक |
|---|---|---|
| अलिबाग | १७ | २५ |
| उरण | ५० | २० |
| कर्जत | ८ | ० |
| खोपोली | ३६ | २ |
| पेण | २९ | १३ |
| महाड | २३ | १३ |
| माथेरान | ६ | ० |
| मुरूड जंजिरा | ७ | ० |
| म्हसळा | ५ | ० |
| रोहा | ६ | ० |
| तळा | २ | ० |
| पोलादपूर | २ | ० |

खालापूर, श्रीवर्धन आणि पाली नगरपालिका आणि नगरपंचायतीनी अद्याप आपले अहवाल जिल्हा प्रशासनाला सादर केलेले नाहीत. या पालिकांनी इमारतींचे सर्वेक्षण करून अहवाल सादर करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.



# मावळच्या जागेसाठी काँग्रेस आग्रही

## ▌ जिल्हाध्यक्ष महेंद्र घरत यांना उमेदवारी देण्याची मागणी

**अलिबाग : प्रतिनिधी**

राष्ट्रवादीकडे असलेला लोकसभेचा मावळ मतदारसंघ आम्हाला सोडावा, असा आग्रह रायगड जिल्हा काँग्रेसने धरला आहे. त्यासाठी काँग्रेसतर्फे महेंद्र घरत हे उमेदवार असणार आहेत. रायगड जिल्हा काँग्रेस कार्यकारिणीच्या बुधवारी (दि. १४) झालेल्या बैठकीत यावर मंथन करण्यात आले. पक्षाचे प्रभारी एस. के. पाटील यांच्याकडेदेखील ही मागणी करण्यात आली आहे.

रायगड जिल्हा काँग्रेस कार्यकारिणीची बैठक बुधवारी अलिबाग येथील काँग्रेस भवनात झाली. या बैठकीला रायगड जिल्हा प्रभारी चारूलता टोकस, सहप्रभारी राणी अग्रवाल, सहप्रभारी श्रीरंग बर्गे, जिल्हाध्यक्ष महेंद्र घरत यांच्यासह जिल्ह्यातील पक्षाचे प्रमुख पदाधिकारी उपस्थित होते. बैठकीनंतर झालेल्या पत्रकार परिषदेत बोलताना बर्गे यांनी मावळच्या जागेसाठी काँग्रेस आग्रही असल्याचे स्पष्ट केले. तशी मागणी आम्ही केली आहे. काल काँग्रेसचे प्रभारी एस. के. पाटील यांची भेट घेऊनही याबाबत चर्चा केली. महेंद्र घरत यांना उमेदवारी द्यावी, अशी मागणी केली असून पाटील यांनी त्याला अनुकूलता दर्शवली आहे. याबाबत लवकरच सर्वेक्षण करून निर्णय घेतला जाणार असल्याचे बर्गे यांनी सांगितले.

**राष्ट्रवादीच्या भूमिकेकडे लक्ष**

सन २००९मध्ये मतदारसंघांची पुनर्रचना झाल्यापासून नव्याने तयार झालेल्या मावळ लोकसभा मतदारसंघात राष्ट्रवादी काँग्रेस निवडणूक लढवित आली आहे. सलग तीन वेळा राष्ट्रवादीचा उमेदवार मावळ मतदारसंघाच्या निवडणूक रिंगणात होता. आता या मतदारसंघावर काँग्रेसने दावा केला आहे. त्यामुळे राष्ट्रवादी काय भूमिका घेणार याकडे लक्ष असणार आहे.

मावळची जागा राष्ट्रवादी काँग्रेसकडे आहे, मात्र त्यांना पराभूत व्हावे लागले, तर शिवसेनेचा विजयी उमेदवार मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे गेला आहे. त्यामुळे आघाडीच्या जागावाटपात ही जागा आम्हाला द्यावी, असे काँग्रेसचे म्हणणे आहे. त्याचप्रमाणे महाडच्या जागेवर आमचा दावा असल्याचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी यापूर्वीच सांगितल्याचे जिल्हाध्यक्ष महेंद्र घरत यांनी या वेळी म्हटले.

दरम्यान, या बैठकीत रायगड जिल्हा काँग्रेसची कार्यकारिणी जाहीर करण्यात आली. यामध्ये राजेंद्र ठाकूर, मिलिंद पाडगावकर, शबिस्ता अन्सारी यांची वरिष्ठ उपाध्यक्ष म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे, तर २९ उपाध्यक्ष, २४ सरचिटणीस, ११ चिटणीस यांची नियुक्ती जाहीर करण्यात आली.

**कागदपत्रे गहाळ प्रकरण**

# कोर्लईत आता प्रत्येक घराचे सर्वेक्षण

**रेवदंडा : प्रतिनिधी**

मुरूड तालुक्यातील कोर्लई येथील उद्धव ठाकरे आणि आमदार रवींद्र वायकर कुटुंबीयांच्या मालकीचे १९ बंगले लपविल्याचे प्रकरण चौकशीप्रविष्ठ असताना या ग्रामपंचायतीची महत्त्वाची कागदपत्रे गहाळ झाली असल्याची बाब समोर आली आहे. या प्रकरणी सखोल चौकशी करण्याचे आदेश रायगड जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. किरण पाटील यांनी मुरूड पंचायत समितीच्या गटविकास अधिकाऱ्यांना दिले आहेत. त्यानुसार कोर्लईत आता प्रत्येक घराचे सर्वेक्षण सुरू करण्यात आले आहे.

ग्रामपंचायतीचा कार्यभार हाती घेताना ही कागदपत्रे उपलब्ध झाली नसल्याचे ग्रामसेवकाने मुरूड पोलिसांना लेखी कळवले. जून २०११ ते नाव्हेंबर २०१७ या कालावधीतील मासिक सभा इतिवृत्त उपलब्ध नसल्याचे त्यात स्पष्टपणे नमूद करण्यात आले आहे. या प्रकाराची गंभीर दखल जिल्हा परिषद प्रशासनाने घेतली आहे. याची कसून चौकशी करावी, असे आदेश जिल्हा परिषदेच्या सीईओंनी मुरूड पंचायत समितीच्या गटविकास अधिकाऱ्यांना दिले आहेत. या प्रकरणाची कायदेशीर तक्रार पोलिसांत नोंदवण्याचे आदेशही देण्यात आलेत. या कालावधीत कार्यरत ग्रामसेवक आणि सरपंच यांची यादीदेखील तातडीने मागवण्यात आली आहे. त्यानुसार कार्यवाहीला सुरुवात झाली आहे. सर्वप्रथम सर्वेक्षणाचे काम हाती घेण्यात आले असून सरकारी कर्मचारी घरोघरी जाऊन घरांचे सर्वेक्षण करीत आहेत.

# राज्यात ५,२२० मेगावॅट क्षमतेची ऊर्जानिर्मिती होणार

**मुंबई : प्रतिनिधी**

ऊर्जा प्रकल्पांना प्रोत्साहन देण्यासाठी राज्यात सौर, पवन आणि नवीकरणीय ऊर्जा प्रकल्प उभारण्यावर भर देण्यात येत आहे. याचाच भाग म्हणून बुधवारी (दि. १४) महानिर्मिती, महात्मा फुले कृषी विद्यापीठ, महाऊर्जा आणि सतलज जलविद्युत निगम लि. यांच्यामध्ये उपमुख्यमंत्री तथा ऊर्जामंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत ५२२० मेगावॅट क्षमतेच्या ऊर्जानिर्मितीचा सामंजस्य करार करण्यात आला.

या माध्यमातून सुमारे ४१ हजार कोटींची गुंतवणूक आणि सहा हजार ७६० रोजगार निर्मिती होणार असल्याचेही फडणवीस यांनी सांगितले.

## निवडक

### मणिपूरमध्ये फुटीरतावाद्यांकडून गोळीबार; नऊ जणांचा मृत्यू

**इम्फाळ** : मणिपूरमध्ये सुरू असलेल्या हिंसाचारदरम्यान सशस्त्र फुटीरतावाद्यांनी इम्फाळचा पूर्व जिल्हा आणि कांगपोकी जिल्ह्याच्या सीमेवर असलेल्या खमेनलोक भागात बुधवारी (दि. १४) रात्री गावकऱ्यांवर भ्याड हल्ला केला आहे. यामध्ये नऊ जणांचा मृत्यू झाला असून १० जण जखमी झाले आहेत. जखमींना रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

### बिपरजॉय चक्रीवादळाआधी गुजरातमध्ये भूकंपाचे धक्के

**कच्छ** : गुजरातमधील कच्छ जिल्ह्यात ३.५ रिश्टर स्केल तीव्रतेचा भूकंप बुधवारी (दि. १४) झाला. अरबी समुद्रात सध्या बिपरजॉय चक्रीवादळ घोंघावत आहे. हे चक्रीवादळ गुरुवारी कच्छच्या किनारपट्टीवर धडकण्याची शक्यता आहे. अशी स्थिती असताना कच्छ जिल्ह्यात अनेक ठिकाणी भूकंपाचे धक्के जाणवले आहेत. त्यामुळे भीतीचे वातावरण आहे.



**पनवेल : या विभागाचे नवनियुक्त सहाय्यक पोलीस आयुक्त अशोक राजपूत यांनी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांची त्यांच्या निवासस्थानी सदिच्छा भेट घेतली. या वेळी लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी राजपूत यांचे अभिनंदन करून पुढील यशस्वी वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.**

# पथविक्रेता समितीच्या विजयी उमेदवारांनी घेतली आमदार प्रशांत ठाकूर यांची भेट

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महापालिकेच्या नगर पथविक्रेता समितीच्या सन २०२३-२४साठी झालेल्या निवडणुकीत विजयी झालेल्या उमेदवारांनी भाजपचे रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांची त्यांच्या पनवेल येथील निवासस्थानी बुधवारी (दि. १४) भेट घेतली. या वेळी आमदार प्रशांत ठाकूर यांनी विजयी उमेदवारांचे अभिनंदन केले आणि पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.



दिनदयाळ अंत्योदय योजना राष्ट्रीय नागरी उपजीविका अभियान अंतर्गत फेरीवाल्यांना सहाय्य या घटकांतर्गत पनवेल महापालिकेच्या नगर पथविक्रेता समितीच्या सन २०२३-२४साठी निवडणुक नुकतीच झाली.
या निवडणुकीमध्ये इतर मागास प्रवर्गामधून प्रतीक्षा अनिल माळी, विकलांग महिला राखीव प्रवर्गातून अंजू राजू कोळी, सर्वसाधारण महिला राखीव प्रवर्गामधून आशा राजू मोरे विजयी झाले. त्यांनी आमदार प्रशांत ठाकूर यांची बुधवारी भेट घेतली. या वेळी माजी नगरसेवक निलेश बावीस्कर, माजी नगरसेविका दर्शना भोईर, भाजप सोशल मीडिया सेलच्या खारघर सहसंयोजिका कांचन बिर्ला, आरपीआयचे शहराध्यक्ष संतोष सोनकांबळे, रितेश खकाळ, रमेश गांधी आदी उपस्थित होते.





# आमदार महेश बालदी यांच्या प्रयत्नाने भाताणपाडा येथे बसविणार ट्रान्सफॉर्मर

## भाजप नेते अरुणशेठ भगत यांच्या हस्ते कामाचे भूमिपूजन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

उरण मतदारसंघाचे आमदार महेश बालदी यांचे प्रयत्न व सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे भाताणपाडा येथे जिल्हा नियोजन समितीच्या निधीतून विद्युत ट्रान्सफॉर्मर बसविण्यात येणार आहेत. या कामाचे भूमिपूजन भारतीय जनता पक्षाचे पनवेल तालुका अध्यक्ष व उरण मतदारसंघ निवडणूक प्रमुख अरुणशेठ भगत यांच्या हस्ते बुधवारी (दि. १४) झाले.

भाताण ग्रामपंचायतीमधील नागरिकांना पावसाळ्यात तसेच पुढील काळात विजेची समस्या उद्‌भवू नये याकरिता पनवेल महापालिकेचे माजी नगरसेवक बबन मुकादम यांनी आमदार महेश बालदी यांच्यासमेवत चर्चा केली होती. त्यानुसार आमदार महेश बालदी यांच्या पाठपुराव्यामुळे जिल्हा नियोजन समितीच्या ११ लाख रुपये निधीमधून ट्रान्सफॉर्मर बसविण्यात येणार आहे. या कामाचे भूमिपूजन भाजप नेते अरुणशेठ भगत यांच्या हस्ते झाले.

भूमिपूजन समारंभास भाताणचे सरपंच तानाजी पाटील, उपसरपंच बाळाराम मुकादम, माजी सरपंच सुभाष भोईर, गुरूनाथ खरके, माजी उपसरपंच वसंत काठावले, सदस्य अरुण पाटील, रजनी किरण मुकादम, अनिल काठावले, रसिका भोईर, अरुणा गाताडे, सुभाष मुकादम, शंकर मुकादम, सावळा ग्रामपंचायतीचे माजी सरपंच प्रफुल माळी, शिवाजी माळी, एमएससीबीचे अधिकारी श्री. खिलारे, ठेकेदार योगेश लबडे यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते आणि ग्रामस्थ उपस्थित होते. हे काम मार्गी लावल्याबद्दल माजी नगरसेवक बबन मुकादम आणि भाजप महिला मोर्चाच्या उत्तर रायगड सरचिटणीस प्रिया मुकादम यांचे ग्रामस्थांनी आभार मानले.

# राज्यात सहा ठिकाणी शिवसृष्टी साकारणार

**मुंबई : प्रतिनिधी**

छत्रपती शिवाजी महाराजांच्या पराक्रमाची माहिती पुढील पिढ्यांना व्हावी तसेच पर्यटकांना राज्याच्या प्रेरणादायी इतिहासाची माहिती व्हावी यासाठी महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाच्या मार्फत राज्यात शिवनेरी, गोराई, बुलढाणा, औरंगाबाद, नाशिक व रामटेक येथे सहा ठिकाणी शिवसृष्टी, उद्यान, संग्रहालय व शिवकालीन थीम पार्क उभारणार आहे. या सर्व कामांसाठी ४१० कोटी रुपयांची तरतुद करण्यात आली असून एक वर्षभरात सर्व कामे पूर्ण करण्यासाठी प्रयत्नशील



आहोत, अशी माहिती पर्यटनमंत्री मंगलप्रभात लोढा यांनी बुधवारी (दि. १४) दिली. मंत्रालयातील दालनात आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते. **(पान २ वर..)**

### *शाळा व महाविद्यालयात युवा पर्यटन क्लब*

*नव्या पिढीला पर्यटनस्थळांचे जतन आणि संवर्धनाचे महत्त्व कळावे यासाठी लवकरच प्रत्येक शाळा व महाविद्यालयात युवा पर्यटन क्लब स्थापन करण्यात येणार आहे. प्रत्येक शाळा व महाविद्यालयानजीक असलेल्या पर्यटनस्थळांचे जतन करावे, स्थानिक ठिकाणी जास्तीत जास्त पर्यटक यावेत यासाठी पर्यटन विभागामार्फत हा उपक्रम राबविण्यात येणार असल्याचे पर्यटनमंत्री लोढा यांनी सांगितले.*

### *थीम पार्क, आचार्य चाणक्य म्युझियम*

*भगूर (जि. नाशिक) येथील स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर थीम पार्कसाठी १५ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली असून सावरकरांचे पूर्ण जीवन चरित्र व अंदमान-निकोबार कारागृहातील प्रमुख घटना यांचा यामध्ये समावेश असेल. कार्ला-आचार्य चाणक्य म्युझियमसाठी ७५ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली असून आचार्य चाणक्य नीतीचे पाच प्रखंड राजनीती, अर्थनीती, सामाजिक नीती, युद्ध नीती, धर्म नीती व याचसोबत सात दिवस ते एक महिन्याचा अभ्यासक्रम शिकविण्यात येईल. शिर्डीला पायी जाणाऱ्या साईभक्तांकरिता पडघा (ता. भिवंडी, जि. ठाणे) येथे निवास व्यवस्थेसाठी तीन कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे.*

# राज्यातील सौरऊर्जा प्रकल्पांना गती द्या

## उपमुख्यमंत्री तथा ऊर्जामंत्री देवेंद्र फडणवीस यांचे निर्देश

**मुंबई : प्रतिनिधी**

राज्यातील विजेची वाढती मागणी आणि शेतकऱ्यांना मुबलक वीजपुरवठा करता यावा यासाठी राज्य सरकारने सौरऊर्जा प्रकल्प राबविण्याचे धोरण तयार केले. संबंधित यंत्रणांनी राज्यात सुरू असलेल्या सौरऊर्जा प्रकल्पांना गती देण्याचे निर्देश उपमुख्यमंत्री तथा ऊर्जामंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले. सह्याद्री अतिथीगृह येथे महाराष्ट्र राज्य ऊर्जा विकास नियामक मंडळाच्या १०५व्या बैठकीत ते बोलत होते.



या बैठकीस ऊर्जा विभागाच्या प्रधान सचिव आभा शुक्ला, उपमुख्यमंत्री यांचे सचिव डॉ. श्रीकर परदेशी, महावितरणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्रा, महापारेषणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ. संजीव कुमार, महाराष्ट्र राज्य ऊर्जा विकास मंडळाच्या (मेडा) महासंचालक डॉ. कादंबरी बलकवडे, स्वतंत्र संचालक विश्वास पाठक आदी उपस्थित होते.

उपमुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, कोळसा आणि पाण्याचा विचार करता सध्या सौर ऊर्जेशिवाय पर्याय नाही. यामुळे महाऊर्जेने मोठ्या सौर ऊर्जा प्रकल्पावर गुंतवणूक करावी. वीजपुरवठा आणि भारनियमनबाबत राज्यातील कोणत्याही भागातील नागरिक, शेतकरी, लोकप्रतिनिधी यांच्या तक्रारी येणार नाहीत याची दक्षता सर्व संबंधित यंत्रणांनी घ्यावी.

या वेळी महाऊर्जाचे संचित आयकर दायित्व अंतर्गत उपाययोजना करून दीर्घकालीन उत्पादक स्वरुपाची भांडवली गुंतवणूक व त्याद्वारे महाऊर्जाचे बळकटीकरण करण्याच्या सूचनाही उपमुख्यमंत्री फडणवीस यांनी केल्या.

मेडामध्ये सेवा प्रवेशाची कमाल वयोमर्यादा वाढवणे, सौरऊर्जा प्रकल्प अधिकारी व प्रकल्प कार्यकारी अधिकारी पदासाठींच्या सरळ सेवा भरतीच्या नियमात सुधारणा, महाऊर्जा कर्मचारी सेवा नियमांतील निवड समिती व पदोन्नती समितीच्या रचनेत सुधारणा करणे, महाऊर्जा आस्थापनेवर कंत्राटी पद्धतीने संगणक संयोजकाची नेमणूक करणे, महाऊर्जा कार्यालयात वरिष्ठ महाव्यवस्थापक संवर्गात ऊर्जा क्षेत्रातील अधिकाऱ्यांची नियुक्ती करणे, ऊर्जाकूर निधी ट्रस्ट अंतर्गत, ऊर्जाकूर श्री. दत्त पॉवर कंपनी लि. यांच्याकडून महाऊर्जाच्या मालकीचे शेअर्स बाय-बॅकद्वारे हस्तांतरीत झालेल्या कार्यवाहीची नोंद घेण्यास मान्यता देण्यात आली.

महाऊर्जा स्वनिधीचे वित्तवर्ष २०२२-२३च्या सुधारित अंदाजपत्रकास व वित्तवर्ष २०२३-२४च्या प्रस्तावित वार्षिक अंदाजपत्रकास मान्यता देण्यात आली.

महाऊर्जाच्या विविध विभागीय कार्यालय अंतर्गत सौर प्रकल्पासाठी आस्थापित करणेसाठी निधी उपलब्ध करून देणे, महाऊर्जाच्या मालकीच्या जागेवर पवन, सौर संकलित प्रकल्प आस्थापित करण्यासाठी महानिर्मिती कंपनीसोबत सामंजस्य करार करण्याबाबत ठराव पारित झाला. महाराष्ट्र राज्य ऊर्जा विकास मंडळाच्या (मेडा) महासंचालक डॉ. कादंबरी बलकवडे यांनी सादरीकरण केले.

# खोपोलीत लाखोंची फसवणूक करणाऱ्या महिलांवर गुन्हा दाखल

**खोपोली : प्रतिनिधी**

मुलाला नोकरी लावण्यासाठी, लग्नासाठी पैसे हवेत, जीएसटीची बिले सोडवण्यासाठी अशी विविध कारणे सांगून पैशाची मागणी करणाऱ्या तीन महिलांवर खोपोली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

रजनी केदारी (४५), रसिका यादव (५०) व वासंती गायकवाड (५०) या तीन महिलांनी संगनमत करून अनेक महिलांची ओळख वाढवली व ओळखीचा गैरफायदा घेत फसवणूक केल्याचा प्रकार पोलीस तपासात उघडकीस आला आहे.

यातील रजनी केदारी यांनी त्यांच्या व्यवसायातील जीएसटीचे बिले सोडवण्यासाठी, वासंती गायकवाड हिने मुलाला नियमित नोकरी लावण्यासाठी, तर रसिका यादव यांनी त्यांच्या मुलीच्या लग्नाचे कारण सांगून या प्रकरणातील तक्रारदार अस्मिता पवार व साक्षीदार नम्रता बैलमारे यांच्याकडून वेळोवेळी रोख रक्कम स्वतःच्या फायद्यासाठी घेतल्याचे त्याचप्रमाणे सोन्याचे दागिने खोपोलीतील विविध ज्वेलर्स व गोल्ड लोन एजन्सीकडे गहाण टाकून तीही रक्कम स्वतःच्या फायद्यासाठी वापरली.

एकूण १४ लाख ६१ हजार रुपयांची रोख व सोन्याचे दागिन्याचे ऐवजाची फसवणूक झाल्याचे तक्रारदारानी पोलिसांना दिलेल्या तक्रारीत नमूद केले आहे.

दरम्यान यातील आरोपी रजनी केदारी हिने वेळोवेळी फिर्यादी व साक्षीदार यांना शिवीगाळ व धमकी दिल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे.

या संदर्भात खोपोली पोलीस निरीक्षक शिरीष पवार यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक निरीक्षक हरेश काळशेकर यांनी भा. दं. वि. ४२०, ४०६, ४१७ प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे. या प्रकरणी अधिक तपास काळशेकर करीत आहेत. आणखी किती महिलांची फसवणूक झाली याचाही तपास पोलीस घेत आहेत.

## 'बिग बॉस मराठी' फेम अभिनेत्री मेघा धाडे भाजपमध्ये



**मुंबई :** 'बिग बॉस मराठी' फेम अभिनेत्री मेघा धाडे हिने भारतीय जनता पक्षात प्रवेश केला आहे. प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्या उपस्थितीत तिने भाजपत प्रवेश केला. या वेळी भाजपच्या सांस्कृतिक विभागाच्या प्रदेशाध्यक्ष अभिनेत्री प्रिया बेर्डेही उपस्थित होत्या.

'बिग बॉस मराठी'च्या पहिल्या पर्वाची ती विजेती होती. 'बिग बॉस मराठी' हा कार्यक्रम सुरू झाल्यापासून त्या शोच्या पहिल्या दिवसापासून मेघा चर्चेत होती. विशेष म्हणजे आजही तिची चर्चा चाहत्यांमध्ये रंगते.

# रायगडातील २०७ ग्रामपंचायतींत आरक्षण सोडतीचा कार्यक्रम जाहीर


**अलिबाग : प्रतिनिधी**

जानेवारी ते डिसेंबर २०२३ या कालावधीत मुदत संपणाऱ्या, नवनिर्मित तसेच सन २०२२मध्ये चुकीची प्रभागरचना, आरक्षण झाल्यामुळे निवडणुका न होऊ शकलेल्या ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी नव्याने आरक्षण सोडतीचा कार्यक्रम निवडणूक आयोगाने जाहीर केला आहे. या कार्यक्रमामुळे रायगड जिल्ह्यातील २०७ ग्रामपंचायतींच्या निवडणुका लागण्याचे संकेत मिळत आहेत.

१७ जानेवारी २०२३ आदेशान्वये राज्यातील जानेवारी ते डिसेंबर २०२३ या कालावधीत मुदत संपणाऱ्या, नवनिर्मित तसेच सन २०२२ मध्ये चुकीची प्रभागरचना झाल्यामुळे निवडणूका न होऊ शकलेल्या ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी प्रभाग रचनेचा कार्यक्रम देण्यात आला. या ग्रामपंचायतीची अंतीम प्रभाग रचना २५ एप्रिल रोजी राज्य निवडणुक आयोगाने आलेल्या हरकती विचारात घेऊन अंतिम केली.

या कार्यक्रमानुसार रायगड जिल्ह्यातील २०७ ग्रामपंचायतींची प्रभाग रचना पूर्ण झाल्याचे शासनाने २५ मेच्या पत्रान्वये कळवले आहे. निवडणूक आयोगाने जाहीर केलेल्या आरक्षण सोडतीच्या कार्यक्रमानुसार १६ जून रोजी विशेष ग्रामसभेची सूचना देणे (आरक्षणाची सोडत काढण्याकरीता), २१ जून विशेष ग्रामसभा बोलवून, तहसिलदार यांनी प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्याच्या अध्यक्षतेखाली, आरक्षणाची सोडत काढणे (अनु. जाती महिला, अनु. जमाती महिला, नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग, नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग महिला व सर्वसाधारण महिला), २२ जून सोडतीनंतर प्रभागनिहाय आरक्षणाचे प्रारूप प्रसिध्द करणे, २३ ते ३० जून प्रभागनिहाय आरक्षण निश्चितीबाबत हरकती व सूचना दाखल करणे, ६ जुलै उपविभागीय अधिकारी यांनी प्राप्त हरकती विचारात घेऊन अभिप्राय देणे, १२ जुलै उपविभागीय अधिकारी यांचे अभिप्राय विचारात घेऊन अंतिम अधिसूचनेस (नमुना अ) जिल्हाधिकारी यांनी मान्यता देणे, १४ जुलै जिल्हाधिकारी यांनी व्यापक प्रसिध्दी देणे असा हा प्रभाग रचनेचा कार्यक्रम राबविण्यात येणार आहे.

| तालुका | : ग्रामपंचायत संख्या |
|---|---|
| अलिबाग | : १५ |
| मुरूड | : १५ |
| पेण | : ११ |
| पनवेल | : १७ |
| उरण | : ०३ |
| कर्जत | : ०७ |
| खालापूर | : २२ |
| रोहा | : १२ |
| सुधागड | : १३ |
| माणगाव | : २६ |
| तळा | : ०६ |
| महाड | : १९ |
| पोलादपूर | : २१ |
| श्रीवर्धन | : ०८ |
| म्हसळा | : १२ |



सध्या या ग्रामपंचायतीवर प्रशासक काम करीत असून अनेक ठिकाणी प्रशासकामुळे कारभार करणे अडचणीचे ठरत आहे. कारण प्रशासक हे पंचायत समितीचे विस्तार अधिकारी दर्जाचे अधिकारी असल्यामुळे त्यांना तिथले कामकाज सांभाळून ग्रामपंचायतीचा कारभार करताना नाकी नऊ येत आहेत.

राज्य निवडणूक आयोगाने या ग्रामपंचायतीच्या प्रभाग रचनेचा कार्यक्रम निश्चित केल्यामुळे प्रभाग निश्चितीनंतर ग्रामपंचायत निवडणूक कार्यक्रम जाहीर होणार आहे. त्यामुळे आता संबंधित ग्रामपंचायत हद्दींमध्ये लगबग सुरू होणार आहे. सुरुवातीला प्रशासकीय प्रक्रिया होईल. त्यानंतर पुढे टप्पे पार पडणार आहेत.

## रोह्यात ४६,६०० पुस्तकांचे होणार विद्यार्थ्यांना वाटप

**रोहा : प्रतिनिधी**

जिल्हा परिषद शाळेच्या २०२३-२४ या शैक्षणिक वर्षाला गुरुवार (दि. १५)पासून सुरुवात होत आहे. शाळेच्या पहिल्या दिवसापासूनच विद्यार्थ्यांना पाठ्यपुस्तकांचे वाटप होणार आहे. तालुक्यात पहिली ते आठवीच्या विद्यार्थ्यांना ४६,६०० पाठ्यपुस्तकांचे जिल्हा परिषद, अनुदानित व नगरपालिकेच्या शाळेतून वाटप होणार आहे.

रोहा तालुक्यात १८ जिल्हा परिषद व एक नगरपालिका अशा १९ केंद्रांतून पुस्तकाचे वाटप प्रत्येक शाळेच्या विद्यार्थ्यांना होणार आहे. याची तयारी पंचायत समिती शिक्षण विभागाने केली आहे. रोहा तालुक्यातील २७० शाळांतील ११,०६३४ विद्यार्थ्यांना या पुस्तकांचे वाटप करण्यात येणार आहे. २०२३-२४ या शैक्षणिक वर्षासाठी तालुक्यातील शाळा सज्ज झाल्या आहेत. गुरुवारी शाळेचा पहिला दिवस असल्याने शाळेकडे येण्यासाठी सगळ्या विद्यार्थ्यांची लगबग असणार आहे.

# पावसाने शाळेची संरक्षण भिंत कोसळली

## सुदैवाने जीवितहानी नाही

**मुरूड : प्रतिनिधी**

मुरूड तालुक्यातील एकदार परिसरात पावसाने जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळेच्या इमारतीच्या संरक्षण भिंतीचा कठडा कोसळला. सुदैवाने शाळा बंद असल्यामुळे जीवितहानी झालेली नाही.ही बातमी मिळताच मुरूड पंचायत समितीचे विस्तार अधिकारी सुभाष वाणी व इंजिनिअर आशिष मुकणे घटनास्थळी येऊन पाहणी केली. यांच्याबरोबर शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष चिंतामणी लोदी, जगन्नाथ वाघरे उपस्थित होते.



मुरूड शहराच्या काही अंतरावर डोंगराच्या कुशीत असलेला एकदरा गाव या गावातील मुलांना चांगलं शिक्षण घेण्यासाठी १९६५ साली रायगड जिल्हा परिषदेच्या मार्फत शाळा बांधण्यात आली. आज या शाळेला ५८ वर्ष झाली. या शाळेत पहिले सातवीपर्यंत शिक्षण दिलं जातं. मुलांच्या संरक्षणासाठी संरक्षण भिंत बांधली गेली होती.हि भिंत आता धोकादायक होऊ लागली आसुन आज त्या संरक्षण भिंतिचा चार मिटरचा भाग कोसळल्याने शाळेचे आर्थिक नुकसान झाले आहे. उद्यापासुन शाळा सुरवात होत आसुन पहिल्या पाऊसात संरक्षण भिंतिचा भाग कोसळल्याने पालक वर्गानी धास्ती घेतली आहे.

आज पाऊसामुळे आमच्या शाळेची संरक्षण भिंतीचा भाग कोसळला ही बाब चिंताजनक आहे. भाग कोसळल्याने पुढील भिंत कमकुवत होत जाणार यात वावगं नाही.काही ठिकाणी संरक्षण भिंतीला तडे पडत चालले आहेत.आता तर पाऊसाला सुरवात झाली आहे.पुढे काय होईल याची कोणालाच कल्पना नाही परंतु मुलांच्या संरक्षणासाठी प्रशासनाने पुढे येवून नव्याने सिमेंट कॉंक्रिटकरण व्दारे संरक्षण भिंत बांधावी. उद्या पासून शाळेचा पहिला दिवस आहे.मुलांची रेलचेल सुरू होईल.मोठा अघात होऊ नये यांची काळजी प्रशासनाने घ्यावी अशी प्रतिक्रिया शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष चिंतामणी लोदी यांनी दिली.

# मुंबईनंतर आता महाराष्ट्र कॉँग्रेसमध्ये होणार बदल?

**मुंबई : प्रतिनिधी**

मुंबई कॉँग्रेसमध्ये बदल केल्यानंतर आता महाराष्ट्र प्रदेश कॉँग्रेस कार्यकारिणीतही लवकरच बदल केले जाणार आहेत अशी माहिती सूत्रांनी दिली आहे. आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर काही जणांना डच्चू दिला जाण्याची शक्यता आहे.

राज्यात कॉँग्रेसची काही वर्षांपूर्वी मजबूत ताकद होती, पण २०१४पासून कॉँग्रेसची पिछेहाट सुरू झाली. २०१९मध्ये तर हा पक्ष चौथ्या क्रमांकावर फेकला गेला. लोकसभेत कसाबसा एक खासदार आणि विधानसभेत ४४ आमदार निवडून आले होते. गेल्या चार वर्षांत पक्षवाढीसाठी फार काही प्रयत्न झाले नाहीत. त्यामुळे महाराष्ट्र कार्यकारिणीत आता बदल केले जाणार आहेत.

विद्यमान कॉँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांच्या कार्यपद्धतीवर अनेक नेत्यांकडून नाराजी व्यक्त केली जात आहे. त्यामुळे पटोले यांना प्रदेशाध्यपदावरुन हटवण्यासाठी पक्षातूनच प्रयत्न होत असल्याचे दिसून येत आहे. या पार्श्वभूमीवर मुंबई कॉँग्रेस अध्यक्षानंतर महाराष्ट्र कॉँग्रेस प्रदेशाध्यक्ष तसेच कार्यकारिणीतही काही बदल केले जाणार असल्याचे समजते.

### नवीन प्रभारी निर्णय घेणार

कॉँग्रेसचे महाराष्ट्र प्रभारी एच. के. पाटील यांना कार्यकारिणीत काय बदल होतील या संदर्भात प्रसारमाध्यमांनी विचारले असता ते म्हणाले की, मी कर्नाटक मंत्रिमंडळात मंत्री होत आहे. त्यामुळे मला महाराष्ट्र प्रभारीपदाचा राजीनामा द्यावा लागला तर जो कोणी, कधी नवीन प्रभारी होईल तो त्यावर निर्णय घेईल.



## पोलीस पाटीलांच्या प्रलंबित मागण्यांसंदर्भात मंत्री गिरीश महाजन यांच्या उपस्थितीत बैठक

**पनवेल : वार्ताहर**

महाराष्ट्र राज्य गाव कामगार पोलीस पाटील संघाचे राज्य अध्यक्ष बाळासाहेब शिंदे पाटील यांच्या नेतृत्वाखाली सह्याद्री अतिथीगृहावर राज्याचे ग्रामविकास मंत्री गिरीश महाजन यांच्या उपस्थितीत आमदार मंगेश चव्हाण यांच्या प्रयत्नामुळे राज्यातील पोलीस पाटलांच्या प्रलंबित मागण्या संदर्भात सविस्तर चर्चा झाली. राज्यातील पोलीस पाटलांना मानधन वाढ आणि इतर मागण्या पूर्ण करण्यासाठी लवकरच कॅबिनेटमध्ये विषय मार्गे लावण्याचे आश्वासन या वेळी देण्यात आले.

या वेळी राज्य सचिव कमलाकर मांगले-पाटील, खजिनदार निळकंठ थोरात पाटील, जळगाव जिल्हाध्यक्ष नरेंद्र शिंदे पाटील, दीपक चौधरी पाटील, किशोर भदाने-पाटील, पुणे जिल्हा उपाध्यक्ष पप्पू काका, राक्षे-पाटील, गुलाब मिढे, राज्य सरचिटणीस विजय कुंजीर-पाटील, कार्याध्यक्ष बाजीराव पवार-पाटील, कामशेत, राज्य संघटक हरिश्चंद्र दुदुस्कर, जिल्हा उपाध्यक्ष दिनेश पाटील, रायगड जिल्हा कार्याध्यक्ष चेरफले, सचिव कुणाल लोंढे, संघटक गणेश ढेणे-पाटील, कर्जत तालुका उपाध्यक्ष डायरे पाटील, कोकण सदस्य महेश जांभळे, जिल्हा महिला अध्यक्ष सरिता रणपिसे, प्रमुख सान्वी चव्हाण, नांदेड जिल्हा अध्यक्ष भास्कर कंकाळ पाटील, प्रवीण गोसावी-पाटील, खानदेश विभाग अध्यक्ष जीवन पाटील, चाळीसगाव अध्यक्ष रवींद्र पाटील, हेमराज पाटील, जळगाव कार्याध्यक्ष रावसाहेब पाटील, उपाध्यक्ष विजय पाटील आदी हजर होते.

पान १ वरून

## राज्यात सहा ठिकाणी शिवसृष्टी साकारणार

मंत्री मंगलप्रभात लोढा म्हणाले, राज्यातील पर्यटनाला चालना मिळावी व त्यातून रोजगार निर्मिती व्हावी यासाठी राज्य शासन व पर्यटन विभाग विविध उपक्रम राबवत आहे. राज्यात येणाऱ्या प्रत्येक पर्यटकाला छत्रपती शिवाजी महाराजांचा इतिहास अनुभवायचा असतो. हे लक्षात घेऊन छत्रपती शिवरायांच्या इतिहासाबाबत सर्व माहिती या शिवसृष्टीतून पर्यटन व शिवप्रेमींना मिळण्यास मदत होणार आहे. शिवसृष्टीच्या कामाबाबत जनतेच्या आलेल्या सूचनांनुसार या कामामध्ये बदल करण्यात येईल तसेच विविध लोगो स्पर्धांचे आयोजनही करण्यात येईल.

शिवनेरी येथे छत्रपती शिवाजी महाराज बाल संस्कार संग्रहालय उभारण्यात येणार आहे. या कामासाठी ७० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. गोराई (मुंबई) येथील महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाच्या जागेवर असलेली अनधिकृत बांधकामे हटविण्यात आली व आता त्या ठिकाणी २५ एकर जागेत छत्रपती शिवाजी महाराज यांचे युद्ध कौशल्य व आरमारसंदर्भात प्रेरणा देणारे संग्रहालय (वॉर म्युझियम) उभारले जाणार आहे. बुलढाणा येथे राजमाता जिजाऊ संग्रहालय, औरंगाबाद येथे धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज संग्रहालय, नाशिक येथे छत्रपती शिवाजी महाराज राजकौशल्य संग्रहालय, रामटेक येथील छत्रपती शिवाजी महाराज हिंदवी स्वराज्य संग्रहालयासाठी प्रत्येकी ५० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. या शिवसृष्टी, उद्यान आणि म्युझिअम, थीम पार्कच्या माध्यमातून पुढील पिढ्यांना राजमाता जिजाऊ, छत्रपती शिवाजी महाराज व धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांचा तसेच महाराष्ट्राचा गौरवशाली इतिहास अनुभवता येणार आहे.

# कर्जतमध्ये रक्तदान शिबिरास प्रतिसाद



**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत शहरातील दहिवली विभागात असलेल्या समर्थ क्लिनिकच्या वतीने जागतिक रक्तदान दिनानिमित्त रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरात ४१ जणांनी रक्तदान केले. सार्वजनिक रक्तदाता राजाभाऊ कोठारी यांनी आयोजित केल्लेले हे ४७६वे रक्तदान शिबिर होते.

समर्थ क्लिनिकमध्ये डॉ. मेघशाम हिवाळे यांनी लायन्स क्लब कर्जत गोल्ड आणि श्री साई रक्तपेढी पनवेल यांच्या सहकार्याने रक्तदान शिबिर घेण्यात आले. लायन्स क्लब कर्जतचे अध्यक्ष मधुकर घारे यांच्या हस्ते शिबिराचे उद्घाटन झाले. उद्घाटनावेळी राजाभाऊ कोठारी, विकास चित्ते, नगरसेवक विवेक दांडेकर, माजी नगरसेवक प्रवीण गांगल, मिलिंद चिखलकर, विजय जिनगरे, गणेश ठोसर, जयेश म्हसे, कृष्णा जाधव आदी उपस्थित होते.

अमेय भोपतराव यांनी सर्वप्रथम रक्तदान करून शुभारंभ केला. या वेळी एकूण ४१ रक्तदात्यांनी रक्तदान करून राष्ट्रीय, सामाजिक व मानवतावादी कार्य केले. विशेष म्हणजे ६५व्या वर्षी पत्रकार विजय मांडे यांनी आपले ७३वे रक्तदान केले. रक्तसंकलानाचे काम पनवेल येथील श्री साई रक्तपेढीचे रूतीज पाटील, साक्षी पाटील, संदीप पाटील, प्राची पाटील आदींनी केले. या वेळी डॉ. प्रशांत सदावर्ते, संजय ठाकरे, दिनेश कडू, कैलास म्हामले, सोमनाथ वाघमारे, अक्षय लाड आदी उपस्थित होते.

### दुखवटा

**संपदा रेवसकर**



**उरण :** चिरनेर येथील संपदा प्रकाश रेवसकर यांचे १० जून रोजी अल्पशा आजाराने निधन झाले. त्या ४६ वर्षांच्या होत्या. त्यांच्या पश्चात दोन मुली, एक पुत्र असा परिवार आहे. कै. संपदा रेवसकर यांचा दशक्रिया विधी १९ जून रोजी श्रीक्षेत्र चिरनेर खाडी येथे, तर उत्तरकार्य २१ जून रोजी चिरनेर येथे होणार असल्याची माहिती राजेंद्र रेवसकर यांनी दिली.

## निवडक

### मोबाईलचोरास पोलिसांनी पकडले

**पनवेल :** मोबाईल असलेली पर्स चोरी करून काळुंद्रे नदीमध्ये पळुन जाणाऱ्या भुरट्या चोरास फक्त तासाभरात पनवेल शहर पोलिसांनी तांत्रिक तपासाद्वारे अटक केली आहे. भाजीविक्रेते मधु अशोक सिंग (वय ४९) हे पनवेल शहरातील मार्केट यार्ड येथे खरेदी करण्याकरीता गेली असता अज्ञाताने त्यांचा मोबाईल असलेली पर्स चोरी करून नेली. याबाबत त्यांनी पनवेल शहर पोलिसांत तक्रार दाखल केली. पोलिसांनी घटनास्थळी जावुन दबा धरून बसलेला आरोपी नितीश राम (वय ३२, रा. करंजाडे) याला पकडण्याच प्रयत्न केला असता आरोपीने संशय आल्याने तो तेथुन समोर असलेल्या काळुंद्रे नदीमध्ये पळुन जाऊ लागला, मात्र पोलिसांनी त्याचा पाठलाग करून शिताफिने पकडले.

### गांजा बाळल्याप्रकरणी कारवाई

**पनवेल :** गांजा हा अंमली पदार्थ बेकायदेशिररित्या विक्री करण्याच्या उद्देशाने स्वतःजवळ बाळगणाऱ्या व्यक्तीस पनवेल शहर पोलिसांनी पळस्पे फाटा परिसरातून अटक केली आहे. शहर पोलीस ठाणे येथील गुन्हे प्रकटीकरण पथकामध्ये कार्यरत असलेले हवालदार अविनाश गंथडे यांना गुप्त बातमीदाराकडुन पळस्पे परिसरात गांजाची विक्री होत असल्याची माहिती मिळाली होती. त्यानुसार पोलिसांच्या पथकाने पळस्पे फाटा येथील पानटपरीमध्ये अमली पदार्थाची विक्री करणाऱ्या आरोपी सोहेल इक्बाल शहा (वय २३) याला ताब्यात घेतले. शहर पोलिसांनी त्याच्याकडून आठ हजार ४७५ रुपये किमतीचा एक किलो १३० ग्रॅम वजनाचा गांजा हस्तगत केला आहे.

### गरजू शाळकरी मुलांना साहित्याचे वाटप

**उरण :** येथील सामाजिक कार्यकर्ते दिलीप साळुंके यांचे सुपुत्र सात्विक साळुंके यांच्या प्रथम वाढदिवसानिमित्त उरण तालुक्यातील पुनाडे धरण वाडीवरील २० शाळकरी मुलांना कपडे, खाऊ व शालेपयोगी शैक्षणिक साहित्य वाटप करण्यात आले. या उपक्रमाचे सर्वत्र कौतुक करण्यात आले. वाढदिवसाच्या निमित्ताने का होईना असे समाजपयोगी उपक्रम समाजात झाले पाहिजेत. जेणेकरून गोर गरिबांना कुठेतरी आधार मिळेल. त्यांच्या जगण्याला बळ मिळेल, अशी प्रतिक्रिया नागरिकांनी व्यक्त केली आहे. या वेळी शिक्षक दिलीप म्हात्रे, रुपाली फडतरे, दिलीप साळुंके, सिंधू साळुंके, सात्विक साळुंके आदी उपस्थित होते.



# ‘महावितरण’चा नागरिकांच्या जिवाशी खेळ!

## स्पार्किंग होत असलेल्या विद्युत पोलकडे डोळेझाक; नागरिकांचा संताप

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेलमधील उरण रोड येथील कोळीवाड्याकडे जाणाऱ्या मुख्य मार्गावरील विद्युत पोलवर स्पार्किंग होत असून त्याकडे महावितरण कंपनीकडून चक्क दुर्लक्ष केले जात आहे. त्यामुळे तेथील नागरिकांच्या जिवाला धोका निर्माण झाला आहे.



महावितरण कंपनीचा बेफिकीर कारभार पनवेलमध्ये पहावयास मिळत आहे. आधीच विजेचा सावळागोंधळ सुरू असताना शहरातील उरण रोड येथील कोळीवाड्याकडे जाणाऱ्या मुख्य मार्गावरील पहिल्याच पोलवर गेल्या काही दिवसांपासून स्पार्किंग होत आहे. पाऊस पडल्यावर तेथे आगीचे लोळ निर्माण होऊन त्याच्या ठिणग्या खाली पडतात. हा रहिवासी भाग असून लगतच एका डॉक्टरचे क्लिनिकही आहे. तेथे नियमित पेशंट येत असतात. त्याचप्रमाणे रस्त्यावरून ये-जा करणाऱ्या नागरिकांनादेखील पोलवरून होत असलेल्या स्पार्किंगमुळे इजा होण्याची भीती आहे. वृद्ध, लहान मुले यांना याचा अधिक धोका संभवतो.

याबाबत स्थानिकांनी जवळच असलेल्या महावितरण कार्यालयात जाऊन तक्रारी केल्या, फोनवरूनही याबाबत कल्पना दिली, मात्र सुस्त असलेला विद्युत विभाग दुरुस्ती करीत नाहीए. त्यामुळे महावितरणचे अधिकारी आणि कर्मचारी एखादी मोठी दुर्घटना होण्याची वाट पहात आहेत का, असा संतप्त सवाल लोक विचारत आहेत.

दरम्यान, याबाबत महावितरणचे अभियंता श्री. बोके यांच्याकडे विचारणा केली असता त्यांनी दुरुस्ती करू, असे सांगितले. आता ही दुरुस्ती होऊन धोकादायक स्पार्किंग कधी थांबते याची नागरिकांना प्रतीक्षा आहे.

> **पनवेल शहरात विद्युत विभागासंबंधी नागरिकांच्या तक्रारी आहेत. त्या महावितरण कंपनीने वेळीच दूर करून नागरिकांना दिलासा द्यावा. यासाठी अधिकारीवर्गाने स्वतः लक्ष देऊन व कर्मचाऱ्यांना योग्य त्या सूचना करून कार्यवाही करावी.**
> **-दर्शना भोईर, माजी नगरसेविका**

## रसायनी कष्टकरीनगरमध्ये घराचे पत्रे उडाले; दोन जण जखमी



**मोहोपाडा : प्रतिनिधी**

रसायनी कष्टकरीनगर येथे वादळी वाऱ्यासह झालेल्या पावसामुळे घरांच्या छतावरील पत्रे उडून नुकसान झाले आहे. नाना वामन गायकवाड आणि रोहिदास भौसिंग कांबळे यांच्या घरावरील पत्रे सोसाट्याच्या वाऱ्यासोबत उडून मोठे नुकसान झाले आहे. तसेच घरावरील पत्रे घरात अंगावर पडून लीलाबाई नाना गायकवाड यांच्या पायाला पत्रा लागल्याने आणि नाना वामन गायकवाड यांना दुखापत झाली.

हे वृत्त समजताच तुराडे ग्रामपंचायतीचे माजी उपसरपंच विश्वनाथ गायकवाड यांनी घटनास्थळी जावून पाहणी करून जखमींची चौकशी करून या घटनेची माहिती सरपंच चंद्रकांत भोईर, ग्रामसेविका अस्मिता मोकल आणि तलाठी माने मॅडम यांना देऊन पंचनामा करण्यास सांगितले आहे. घटनेतील जखमींना मदत आणि नुकसान भरपाई लवकरात लवकर मिळावी, अशी आशा व्यक्त केली आहे.

## शांतता व सलोखा राखावा; पोलिसांचे आवाहन



**पनवेल : वार्ताहर**

सोशल मीडियावर आक्षेपार्ह पोस्ट व स्टेटस यामुळे वारंवार राज्यभरात तणावाचे वातावरण निर्माण होत आहे. या घटनेचे पडसाद पनवेल शहरात उमटण्याच्या शक्यता लक्षात घेऊन पनवेल पोलिसांनी खबरदारी घेतली आहे. या अनुषंगाने शांतता कमिटीची बैठक वरिष्ठ पोलीस निरीक्षक विजय कादबाने यांच्या अध्यक्षतेखाली झाली.

या वेळी सर्वधर्मीय व सर्वपक्षीयांना शांततेचे आवाहन विजय कादबाने यांनी केले आहे. कायदा व सुव्यवस्था अबाधित रहावी कुठेही कोणताही अनुचित प्रकार घडू नये, यासाठी पोलिसांनी ही खबरदारी घेतली आहे. याअनुषंगाने शांतता कमिटीची बैठक वरिष्ठ पोलीस निरीक्षक विजय कादबाने यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. या वेळी वपोनि विजय कादबाने यांनी काही अनुचित प्रकार निदर्शनास आल्यास तत्काळ पोलीस ठाणे येथे माहिती द्यावी या बाबत सूचना केल्या.

या वेळी शांतता कमिटीचे सदस्य व सेवानिवृत्त पोलीस अधिकारी विनोद चव्हाण, पोलीस मित्र चंद्रशेखर सोमण, पनवेल एज्युकेशन सोसायटी अध्यक्ष इकबाल काझी, माजी नगरसेवक रमेश गुडेकर, अच्युत मनोरे, माजी नगराध्यक्ष सईद मुल्ला, व्यापारी असोशिएशनचे चित्तरमैल जैन, स्वाभिमानी रिपब्लिकन पक्षाचे जिल्हाध्यक्ष महेश साळुंखे, पराग बालड, जवाद काझी, पोलीस निरीक्षक (गुन्हे) प्रमोद पवार, सहाय्यक पोलीस निरीक्षक बजरंग राजपूत यांच्यासह गोपनीय विभागाचे अधिकारी संजय धारेराव यांच्यासह शांतता कमिटीचे सदस्य आदी उपस्थित होते.

## लग्न समारंभात चोरलेले दागिने घरातच सापडले

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल येथे आपल्या नातेवाईकाच्या लग्नासाठी सहकुटुंब नाशिक वरून आलेल्या एका महिलेच्या बॅगमधील दागिने लग्नात आलेल्या इतर वऱ्हाड्यांपैकी एकाने चोरून नेले होते. या घटनेबाबत महिलेने पनवेल शहर पोलिसांकडे आपली कैफियत मांडताच पनवेल शहर पोलिसांनी काही तासांत चोरीस गेलेले दागिने महिलेला पुन्हा मिळवून दिले.

पनवेल शहरात आपल्या नातेवाईकाच्या लग्नसमारंभात सहभागी एक महिला सहकुटुंब नाशिकवरून आली होते. लग्न समारंभात वापरण्यासाठी आणलेले अंदाजे साडेचार लाखाचे दागिने या महिलेने बॅगमधील कपड्याखालील एका पाऊचमध्ये ठेवले होते व लग्न समारंभात सहभागी झाली होती. हळदी समारंभाच्या दिवशी तयार होण्यासाठी या महिलेने दागिन्यांची पाऊच उघडली असता त्यामधून काही दागिने चोरीस गेल्याचे तिच्या लक्षात आले. पनवेल शहर पोलिसांकडे दागिन्यांच्या चोरीची कैफियत मांडली.

गुन्हे

पोलिसांच्या पथकाने घटनास्थळी जाऊन विचारपूस केली. यानंतर आरोपीने घाबरून चोरलेले दागिने एका कागदाच्या पुडीत बांधून सोफ्याच्या खाली टाकले. घर साफ करत असताना त्या महिलेला ती पुडी मिळाली.

## गव्हाण विद्यालयात किटकनाशक फवारणी

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेच्या गव्हाण येथील श्री. छत्रपती शिवाजी विद्यालय व ज. आ. भगत ज्युनिअर कॉलेजमध्ये लॅम्बडा १० टक्के कीटकनाशक पावडर फवारणी पहिली फेरी राबविण्यात आली.



उन्हाळ्याच्या सुटीनंतर गुरुवार (दि. १५)पासून नवीन शैक्षणिक वर्ष सुरू होत आहे. पावसाळ्यापूर्वी शालेय परिसर स्वच्छता आणि कीटकनाशक प्रतिबंधक औषध फवारून कीटकजन्य रोग नियंत्रित करण्यासाठी रायगड जिल्हा हिवताप प्रतिबंधक अधिकारी कार्यालय, अलिबाग अंतर्गत गव्हाण प्राथमिक आरोग्य केंद्र गव्हाण यांच्या कर्मचाऱ्यांनी ही 'किटकजन्य रोग नियंत्रण कार्यक्रम जनजागृती मोहीम' विद्यालयात राबवल्याची माहिती विद्यालयाचे उपमुख्याध्यापक तथा प्रभारी प्राचार्य प्रमोद मंडले यांनी दिली.

पनवेल तालुका तांत्रिक पर्यवेक्षिका नम्रता बच्छाव यांचे नेतृत्त्वाखालील पथकाने ही मोहीम राबवली. या पथकामध्ये आरोग्य कर्मचारी मोहन लक्ष्मण जगताप व जगदीश सुधाकरराव कदम तसेच क्षेत्र कर्मचारी वैभव नारायण म्हात्रे आणि फवारणी हवालदार राजकुमार घरत, अनिल धर्माजी घरत, दिलीप बाळाराम घरत, परशुराम हरिभाऊ घरत, संजय रामचंद्र म्हात्रे आणि नरहरी पद्मा घरत आदींचा समावेश होता.

## कळंबोलीत नालेसफाईला वेग

**कळंबोली : रामप्रहर वृत्त**

कळंबोली परिसरामधील नालेसफाईची कामे युद्धपातळीवर सुरू आहेत. या कामांची पाहणी भाजप पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी केली. ज्या ठिकाणी अजूनही कामे सुरू आहेत ती लवकरात लवकत पूर्ण करण्याचे निर्देश त्यांनी अधिकाऱ्यांना या वेळी दिले.

पनवेल महापालिका क्षेत्रात पावसाळापूर्व कामे आता अंतिम टप्प्यात आली आहेत. कळंबोली सेक्टर ५ ए के एल १ या ठिकाणी गेल्यावर्षी पावसाळ्यात पाणी तुंबून नागरिकांना त्रास सहन करावा लागला. त्या अनुषंगाने यावर्षी कळंबोली सेक्टर ५ ए के एल १ या ठिकाणी नाले, ड्रेनेज सफाई करताना विशेष काळजी घेण्यात येत आहे. यांसह आजूबाजूच्या परिसरामध्येही पावसाळ्यात नाल्याचे पाणी तुंबून नागरिकांना कोणतीही समस्या उद्‍भवू नये यासाठी शहरात नालेसफाईची कामे सुरू आहेत.



या कामांची भाजपचे कळंबोली मंडल अध्यक्ष रविनाथ पाटील, सरचिटणीस दिलीप बिस्ट तसेच भाजप कार्यकर्ते यांनी पाहणी करून कामे लवकरात लवकर पुर्ण करण्यातचे निर्देश दिले. या वेळी पनवेल महापालिकचे स्वच्छता निरीक्षक अरुण कांबळे, अधिकारी वर्ग, कामगार वर्ग उपस्थित होता.

## पनवेल-रेल्वे ट्रॅकच्या दुपदरीकरणामुळे तक्का भुयारी मार्ग तीन महिने बंद

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल-रेल्वे ट्रॅकच्या दुपदरीकरणाचे काम सुरू झाल्याने तक्कामार्गे विचुंबे, नवीन पनवेलकडे तर नवीन पनवेल-विचुंबेमार्गे पनवेल, तक्काकडे येण्या-जाण्यासाठीचा भुयारी मार्ग बंद करण्यात आला आहे, वाहनांना पूर्णपणे प्रवेश बंदी घोषित करण्यात आली आहे.

दुपदरीकरणाचे काम अंदाजे तीन महिने चालू राहणार आहे. विचुंबे, पोदी, नवीन पनवेलच्या काही भागातील नागरिकांनी नवीन पनवेलमधील फायर ब्रिगेड, एचडीएफसी सर्कल या मार्गाचा वापर करावा असे सांगून नागरिकांनी आपली गैरसोय टाळण्यासाठी पर्यायी मार्गाचा वापर करावा, असे आवाहन पनवेल शहर वाहतूक शाखेतर्फे करण्यात आले आहे.



## शालेय वस्तूंच्या खरेदीसाठी गर्दी

**उरण : वार्ताहर**

शाळेचा युनिफॉर्म, नवीन दप्तर, वह्या, पुस्तके कार्टूनच्या चित्रांची कंपास पेटी, रंगबेरंगी डबे विविध आकाराच्या पाण्याच्या बाटल्या अशा सगळ्या नव्या नव्या वस्तूंची खरेदी करण्यासाठी पालकांसह मुलांची गर्दी उरण बाजार पेठेच्या दुकानांमध्ये दिसत आहे.



मुलांना शाळा सुरू होण्याचे वेध लागले आहे. १५ जूनपासून शाळा सुरू होण्याच्या मार्गावर आहेत. त्यामुळे शाळामध्ये नवीन वर्ग, नवीन मित्र अशा स्वप्नात रंगलेले बाल विद्यार्थ्यांची शालेय साहित्य घेण्यासाठी लगबग सुरू झाली आहे, कर्जत बाजारपेठेत सध्या शालेय वस्तू, शालेय युनिफॉर्म मिळत असलेल्या दुकानांमध्ये मोठ्या प्रमाणात गर्दी दिसत आहे. शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी असलेल्या रुपम ड्रेसेस दुकानात स्कुल युनिफॉर्म, स्कुल बॅग, रेनकोट, छत्री खरेदी साठी पालकांसह विद्यार्थी मोठ्या प्रमाणात गर्दी दिसत आहे, मार्केटमध्ये नवीन फॅन्सी आलेल्या स्कूल बॅग, रेनकोट खरेदीवर विद्यार्थाचा जोर दिसत आहे.

शाळेसाठी लागणारी शालोपयोगी वस्तू वह्या, पेन पेन्सिल, पुस्तके आदी खरेदी करण्यासाठी येल्या आठवड्या पासून मुलांनी व पालकांनी गर्दी केली होती. वह्या, नवीन पुस्तके काह्डेडी साठी मुलांनी दुकानांत गर्दी केली होती १५ जून पासून शाळा सुरु होणार असल्याने सकाळी व सायंकाळी खूपच दुकानांत गर्दी असते, असे मिलन बुक स्टोअरचे परबत मेर यांनी सांगितले.



**उरण : पावसाळापूर्व कामे करणारे नगर परिषदचे स्वच्छतादूत दिलीप गायकवाड, सिद्धार्थ कासारे, नरेश पावसकर, गणेश गुडेकर यांना नगर परिषदेच्या वतीने प्रोत्साहनपर बक्षीस देण्यात आले. मुख्याधिकारी राहुल इंगले यांच्या हस्ते बुधवारी त्यांना गौरविण्यात आले. या वेळी अभियंता झुंबर माने, आरोग्य निरीक्षक हरेश तेजी व कर्मचारी उपस्थित होते.**

## कळंबोली परिसरात आढळला मृतदेह

**पनवेल :** कळंबोली येथील भारत पेट्रोलियमच्या पेट्रोलपंप च्या समोरिल फुटपाथ जवळच्या झाडाखाली बेशुध्द अवस्थेत मिळून आल्याने त्यास पुढील उपचारासाठी एम.जी. एम. हॉस्पीटल कामोठे येथे घेवुन गेले असता डॉक्टरांनी त्यास तपासून मयत घोषित केले. मयत व्यक्तीचे वय अंदाजे ३० ते ३५ वर्षे, उंची पाच फुट पाच इंच, डोक्याचे टक्कल व मिशीचे केस, कपाळ अरूंद, नाक सरळ, अंगावर कपडे नाहीत. या व्यक्तीबाबत काही माहिती असल्यास कळंबोली पोलीस ठाणे (०२२२७४२३०००) किंवा पोलीस उप निरीक्षक माधव इंगळे यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

## मोहोपाड्यात पर्यावरण दिनानिमित्त कार्यक्रम

**रसायनी : प्रतिनिधी**

जागतिक पर्यावरण दिनानिमित्त बॉम्बे डाईंग कंपनीतर्फे रविवारी (दि.११) प्लास्टिक प्रदूषणावर मात या विषयावर जागरूकता वाढविण्यासाठी मोहोपाडा येथे कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमातंर्गत सकाळी विद्यार्थ्यासाठी चित्रकला आणि निबंध लेखन (विषय - प्लास्टिक प्रदूषणावर मात) याचे आयोजन केले गेले. त्यामध्ये शाखा पहिली ते दहावीच्या विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला.

संध्याकाळी कंपनी वसाहतमध्ये राहणारे कर्मचारी आणि त्यांच्या परिवारांच्या हस्ते वेगवेगळ्या प्रजातींच्या झाडांचे वृक्षारोपन करण्यात आले. त्यामध्ये कंपनीचे उपाध्यक्ष भागबान कार, महाप्रबंधक बी. पी. मिश्रा, सुभाष खुंटिया आणि कंपनीच्या पर्यावरण विभागाचे पदाधिकारी अतुल मोरे, निलेश जाधव, स्वामिनाथ गुप्ता, नंदू हडप आणि पंकज दवे यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

वृक्षरोपणानंतर प्लास्टिक प्रदूषणावर मात या विषयाला अनुसरून कार्यशाळेचे आयोजन केले गेले. या कार्यकमाला कंपनीचे कर्मचारी आणि त्यांच्या परिवाराचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.




(छाया : बी. एस. कुलकर्णी)

## संपादकीय

# हायवेवरील हाहाकार

मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावर मंगळवारी भीषण अपघात झाल्याने रस्ते सुरक्षेचा मुद्दा पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. अत्याधुनिक गुळगुळीत रस्ते उपलब्ध झाले याचा अर्थ वाहने बेदरकार चालवण्याचा परवाना मिळाला असे मानण्याचे कारण नाही.

**पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या मंत्रिमंडळातील सर्वांत लोकप्रिय आणि कार्यक्षम मंत्री म्हणून नितीन गडकरी यांचा लौकिक आहे. मोदी सरकारच्या गेल्या नऊ वर्षांच्या कार्यकाळात रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्रालयाचा कारभार गडकरी एकहाती सांभाळत आहेत आणि त्यांच्या कामाचा झपाटा विलक्षण आहे. आधीच्या सहा दशकांमध्ये झाले नसेल एवढे रस्तेबांधणीचे काम गडकरी यांच्या कार्यकाळात पूर्ण झाले. लालफितीच्या कारभारात अडकलेले अनेक प्रकल्प त्यांनी मार्गी लावले. लेह-लडाखच्या दुर्गम प्रदेशापासून कन्याकुमारीपर्यंत अत्याधुनिक रस्त्यांचे जाळे उभे करण्याचा संकल्प गडकरी यांनी सोडला होता. येत्या वर्ष-दीड वर्षात भारतातील वाहतूकव्यवस्था अमेरिकेच्या तोडीची होईल अशी खात्री त्यांनी अलीकडेच एका कार्यक्रमात दिली, परंतु ही चांगली बातमी कानावर आल्यानंतर काही दिवसांतच मुंबई-पुणे एक्स्प्रेस महामार्गावर टँकर उलटून चार जण होरपळल्याची धक्कादायक घटना घडली. गडकरी यांच्यासारखा जिद्दी आणि कष्टाळू मंत्री नसता तर मुंबई-पुणे महामार्गासारखा आव्हानात्मक प्रकल्प कधीच पुरा झाला नसता. गडकरी यांचे पहिले स्वप्न म्हणून ओळखल्या जाणाऱ्या मुंबई-पुणे महामार्गावर हा अपघात व्हावा हे दुर्दैव. विकासाची फळे मधुर असतात, परंतु त्याची किंमतही मोजावी लागते हे पुन्हा लक्षात आणून देणारी ही दुर्घटना आहे. मंगळवारी लोणावळ्यानजीक मुंबईच्या दिशेने जाणाऱ्या टँकरचा भीषण अपघात झाला. टँकरमधील रसायनांनी पेट घेतल्यामुळे चौघांचा मृत्यू झाला. आग इतकी भीषण होती की, रसायनांचे पेटते गोळे अंगावर पडल्याने पुलाखालून दुचाकीवरून जाणारी एक स्थानिक महिला आणि तिच्याबरोबर असलेल्या दोन मुलांचा मृत्यू झाला. चालकाचे टँकरवरील नियंत्रण सुटल्याने तो दुभाजकाला धडकून आग लागल्याचा अंदाज व्यक्त केला जात आहे. या दुर्घटनेमुळे मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावरील वाहतूक सुमारे साडेपाच तास खोळंबली होती. पोलीस आणि महामार्ग प्रशासनाने लवकरात लवकर वाहतूक सुरळीत करण्यासाठी धावाधाव केली. रसायनांची आग तातडीने आटोक्यात आणणे कठीण असते. महामार्गावर खोळंबलेली काही वाहने जुन्या हायवेवर वळवण्यात आली होती, पण तेथेही वाहतूक कोंडीशी सामना करण्याची वेळ आली. द्रुतगती मार्गावर प्रवास करण्यापूर्वी वाहनचालकांनी काही दक्षता घेणे आवश्यक ठरते. सरकारी सक्तीमुळे नुसता सीटबेल्ट लावून सगळे अपघात टाळता येत नाहीत. वाहनांची देखभाल वेळोवेळी करणे हेदेखील अनिवार्य करण्याची वेळ आता आली आहे. द्रुतगती मार्गांवर वेगाने वाहन चालवताना अनेकदा वाहनचालकाचे नियंत्रण सुटते. वाहनाचे टायर चांगल्या स्थितीत नसतील तर टायर फुटून अपघात होण्याची शक्यता वाढते. वास्तविक वाहनचालकाचा परवाना मिळवताना किंवा वाहन विकत घेताना ही माहिती प्रत्येकाला दिलेली असते. वाहनचालक प्रशिक्षण संस्थांमध्येही हे बेसिक धडे गिरवले जातात. तरीही शिस्त नसल्यामुळे अपघातांना निमंत्रण मिळते. केंद्रीय मंत्री गडकरी यांनी कितीही चांगले रस्ते बांधून दिले तरी त्याचा उपयोग लोक कसा करतात यावर विकासाचा खरा वेग ठरतो. लोणावळ्यातील अपघात सर्वांनाच बरेच काही शिकवून जाणारा आहे. शिस्त पाळली तर असे अपघात निश्चितच टाळता येऊ शकतील असे वाटते.**

# पोलादपुरातील कुडपणचे रूप बदलतेय!

**खबरबात — शैलेश पालकर**



कुडपण बुद्रुकमध्ये धनगरवाडी, पहिले कुडपण आणि मधले कुडपण यांचा समावेश असून कुडपण खुर्दमध्ये शेलारांचे कुडपण ही मोठी लोकवस्ती आहे. साधारणपणे या आधीच्या युती सरकारच्या काळामध्ये तत्कालीन ग्रामविकासमंत्री स्व. प्रभाकर मोरे यांनी ब्रिटीशकालीन हिलस्टेशन असलेल्या पोलादपूर तालुक्यातील कुडपण गावाच्या विकासकामाला सुरूवात केली, मात्र त्याकाळी पोलादपूर सार्वजनिक बांधकाम उपविभाग अस्तित्वात नव्हता आणि केवळ महाड येथे सार्वजनिक बांधकाम विभाग असल्याने या कामाला गती प्राप्त झाली नाही. त्यानंतरचे आ. स्व. माणिकराव जगताप यांनी कुडपणवर अतोनात प्रेम केले. या गावाचे रस्ते सुकर करून बांधकाम विभागाचा अधिकाधिक निधी उपलब्ध केल्यामुळे या गावाने आजपर्यंत त्यांना साथ दिली असली तरी विकासापासून वंचित राहून अधिककाळ साथ देणे कुडपणकरांना मानवणारे नव्हते. कुडपणच्या विकासाबाबत कधी विधानपरिषद सदस्य प्रवीण दरेकर यांनी विधीमंडळ अधिवेशनामध्ये प्रश्न उपस्थित केले तर आता कुडपणकरांची साथ विकासाला असल्याचे स्पष्ट होत असून आता स्थानिक आमदार भरत गोगावले यांच्यासोबत जाऊन विकासकामे पूर्ण होत आहे.

कुडपणचा इतिहास कोणालाही सांगता येण्यासारखा प्रचलित नाही. महाराष्ट्रगौरव पुरस्कार मिळालेले महावीरचक्रप्राप्त नाईक कृष्णा सोनावणे यांच्या जन्मगांवाचा उल्लेख या गावाच्या अनुषंगाने कायम केला जाऊ शकेल. गेल्या २५ वर्षांपासून ब्रिटीशकालीन नकाशामध्ये हिलस्टेशन अशी या कुडपणबाबत नोंद असल्याची माहिती मिळाल्यानंतर याठिकाणी पर्यटकांची रेलचेल वाढू लागली आहे, मात्र प्रत्यक्षात याठिकाणी अनेक गैरसुविधा असल्याने या कुडपणच्या विकासाच्या मानसिकतेचा आलेख मांडण्याची गरज निर्माण झाली आहे.

दरीखोऱ्यांतून पहाडी स्वरूपाची राकट देहाची काटक माणसे कुडपण परिसरामध्ये वास्तव्याला होती. याठिकाणी मांत्रिक तांत्रिक आणि शिकार करून अन्न मिळविण्यासोबत कंद आणि अन्य रानभाज्यांचाही उपभोग घेतला जात असे. या परिसरातील वनौषधींची चर्चा अगदी मुंबईपर्यंत होत असून तोरणे, जांभळे, करवंदे, आंबे, फणस आदींची लयलूट करण्यासाठी मुंबईस्थित कुडपणकर ग्रामस्थ उन्हाळ्याचे किमान १५ दिवस तरी वास्तव्य करण्यास येत असत. आध्यात्मिकदृष्ट्या श्रीगणेशनाथ महाराज संस्थानाशी नाळ जोडल्यानंतर कुडपणकरांनी हरि भक्त परायण भुमिकेतही मांसाहार वर्ज्य करून हरी नाम जपण्यास सुरूवात केली.

कुडपण येथील भराडा, भुतरान आणि आवेरी या तीन नद्यांच्या उगमस्थानाजवळच जगबुडी नदीमध्ये संगम झाला आहे. तेथे औदूंबराचा एक निष्पर्ण वृक्ष आश्चर्यकारकरित्या जीवंत स्थितीत आहे आणि तो या त्रिवेणी संगमावर दीडशे वर्षांपासून पानांविनाच वाढत आहे. याठिकाणी असलेल्या स्वयंभू भराडीदेवीच्या मंदिरामध्ये काळकाईदेवीदेखील आहे. अतिशय प्राचीन असे हे देवस्थान असून आजही त्याच स्थितीत आहे. या मंदिरात एक विशाल पुरातन सांबरशिंग मंदिरात प्रवेश केल्यानंतर दिसून येते. अलिकडेच, एका भाविकाने भराडीमातेला सोन्याचा मुकूट अर्पण करून नवसपूर्ती केली आहे. यावरून या भराडीमातेची प्रचिती भाविकांना आजही येत असल्याची तालुक्यात चर्चा आहे. अलिकडेच या कुडपण गावात वातारकांब नावाची एक गुहा आढळून आली आहे. पोलादपूर तालुक्यात पायटे गावातही भराडीमातेचे मंदिर आहे. ज्याप्रमाणे पुणे जिल्ह्यातील सिंहगड येथे नरवीर तानाजी मालुसरे यांची समाधी आढळून येते तशीच दुसरी समाधी पोलादपूर तालुक्यातील उमरठमध्ये दिसते. त्याचप्रमाणे पोलादपूरच्या उमरठमधील नरवीर तानाजी मालुसरे यांच्या समाधीमध्ये शेलारमामांचीही समाधी असून शेलारमामांची दुसरी समाधी कुडपण येथे असल्याचे सांगितले जात आहे.

कुडपण येथे प्रस्तरारोहण करण्यासाठी येथील भिमाची काठी या दूर्गम सुळक्यावर चढाईसाठी काही गिर्यारोहकही तीन-तीन दिवसांचे कॅम्प करतात. यापूर्वी याठिकाणी गिर्यारोहकांनी बर्मा ब्रिज हा तात्पुरता दोरखंडाच्या साह्याने पुल बांधून भिमाच्या काठीपर्यंत जाण्याचा यशस्वी प्रयत्न केला होता. शेलारांच्या कुडपणकडे प्राथमिक व शाळा, माध्यमिक शाळा आहे. सद्गुरू अरविंदनाथ महाराजांच्या आध्यात्मिक मार्गदर्शनामुळे उत्तम गांवगाडा चालतोय, मात्र रस्ता नसल्याने अनारोग्य व अपघातप्रसंगी आजही फारच अडचण निर्माण होत आहे. पोलादपूर तालुक्यातील कुडपण हे गांव इंग्रजांनी केलेल्या सर्वेक्षणानुसार हिलस्टेशन असल्याचे नमुद करण्यात आले. या गावाचे सुपुत्र नायक कृष्णा सोनावणे यांनी ब्रिटीशांच्या बॉईज कंपनीतून सैन्यात प्रवेश घेतल्यानंतर स्वतंत्र भारतातील सेनादलामधून पाकिस्तानी सैन्याची आणि कबाली घुसखोरांची दाणादाण उडविल्याबद्दल त्यांचा महावीरचक्र देऊन सन्मान करण्यात आला. त्याकाळी जन्मगावी कुडपण येथे सेवानिवृत्तीनंतर राहून उर्वरित आयुष्य कंठणे, तेथील अविकसित आणि भौगोलिक परिस्थितीमुळे केवळ अशक्य असल्याने त्यांनी येथे राहणे टाळले.

पोलादपूर, गोळेगणी, क्षेत्रपाळ ते कुडपण हा २६ कि.मी. अंतराचा रस्ता सार्वजनिक बांधकाम विभागाच्या पोलादपूर उपविभागाकडे वर्ग झाल्यामुळे आंबेनळी घाटालाही भविष्यात पोलादपूर तालुक्यातच पर्याय निर्माण करण्यात आला आहे. कुडपणकरांना अनेक वर्षांपासून कोंडूशीमार्गे महाबळेश्वरला जोडणारा रस्ता पाहिजे असल्याने येत्या वर्षभरात कोंडूशीमार्गे सातारा जिल्ह हद्द रस्ता साकारण्याकामी पाठपुराव्याचे आश्वासन आमदार गोगावले यांनी दिल्याने आता कुडपणकरांचा विश्वास आणि कल विकासकामांकडे झुकल्याचे दिसून येत आहे. एकेकाळी, एकीकडे क्षेत्रपाळजवळील रस्त्यासाठी तत्कालीन रायगड जिल्हा परिषदेचे उपाध्यक्ष माणिक जगताप यांनी राज्यमंत्री सुनील तटकरे यांच्या उपस्थितीत कुडपण रस्त्याचा नारळ फोडला. दुसरीकडे गेल्या काही वर्षांपूर्वी परमपूज्य अरविंदनाथ महाराजांच्या उपस्थितीत माजीमंत्री प्रभाकर मोरे यांनी तत्कालीन रायगड जिल्हा परिषद अध्यक्षा अपेक्षा कारेकर यांच्यामार्फत कुडपणला रस्ता करण्यासाठी भूमिपूजन केले आणि तरीही दोन्ही रस्ते अपूर्ण अवस्थेत राहिले होते. कोकणचा अर्थसंकल्प राज्यभर विविध प्रतिक्रिया व्यक्त होत असताना अर्थसंकल्पावरील चर्चे दरम्यान, पोलादपूरचे भूमिपुत्र व तत्कालीन महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे आमदार प्रवीण दरेकर यांनी रायगडचे भूमिपुत्र असलेल्या तत्कालीन अर्थमंत्री सुनील तटकरे यांचे हिलस्टेशन कुडपणच्या विकासाकडे दूर्लक्ष झाल्याची प्रतिक्रिया व्यक्त करून राज्याचे लक्ष कुडपणकडे वेधले. कुडपणचा पर्यटनदृष्ट्या विकास करण्यासंदर्भात प्रशासनाला रामदास कळंबे यांनी कुडपणपर्यंतच्या धबधबा आणि भिमाची काठी तसेच जगबुडीनदीच्या विहंगम दृश्याची माहिती दिली.

स्थानिक आमदार गोगावले यांनी पर्यटनमंत्री अदित्य ठाकरेंना कुडपणला आणण्याची डरकाळी फोडली होती. मात्र, प्रत्यक्षात तसे न घडल्याने आमदार गोगावले यांनी बंडाची भुमिका घेतली. त्यानंतर तत्कालीन पालकमंत्री अदिती तटकरे यांनी निधी उपलब्ध केला असताना तो रोकणारे आमदार गोगावले आता पुन्हा एक कोटी ६० लाखांचा निधी घेऊन कुडपणच्या विकासासाठी सज्ज झालेले दिसत आहेत आणि आमदार गोगावले यांच्या माध्यमातून विकास करून घेण्यासाठी आता यापुढे कुडपणकर ग्रामस्थदेखील सज्ज झालेले दिसून येणार आहेत.



## बदलते तंत्रज्ञान

# फोन पाण्यात पडल्यानंतर 'या' स्टेप्स फॉलो करा



तुमचा फोन कधी पाण्यात पडला का? आपल्यापैकी बऱ्याच लोकांसोबत असं घडतं. फोन पाण्यात पडल्यावर आपण फोन सुधारण्यासाठी वाट्टेल ते प्रयत्न करतो, पण आज आपण काही खास टिप्स जाणून घेणार आहोत.

**स्टेप १** : जर तुमचा फोन पाण्यात पडला असेल तर शक्य होईल तितक्या लवकर पाण्यातून बाहेर काढा. काही स्मार्टफोनमध्ये वॉटरप्रूफ कोटिंग असते, जे फोनला पाण्यापासून सुरक्षित ठेवते पण जास्त वेळ फोन पाण्यात असेल तर कधी कधी वॉटरप्रूफ कोटिंगही निरुपयोगी ठरते.

**स्टेप २** : फोन पाण्यातून बाहेर काढल्यानंतर लगेच स्विच ऑफ करा. फोन स्विच ऑफ केल्याने फोनच्या आतमध्ये कोणत्याही प्रकारचे शॉर्ट सर्किट होण्यापासून मदत होते.

**स्टेप ३**: फोन स्विच ऑफ केल्यानंतर फोनची बॅटरी, सीम कार्ड, मेमरी कार्ड, फोन कव्हर बाजूला काढा आणि कपड्याने फोन चांगला पुसा.

**स्टेप ४** : जर फोनमध्ये पाणी असेल तर फोन चांगला शेक करा. जर हेडफोन जॅक, चार्जिंग पोर्ट आणि फोनच्या बटणसमध्ये पाणी असेल तर शेक केल्यामुळे बाहेर पडेल. त्यानंतर पुन्हा कोरड्या कपड्याने किंवा टॉयलेट पेपरने फोन चांगला पुसून घ्या.


**स्टेप ५** : त्यानंतर फोन तांदळाच्या बंद पोत्यात किंवा डब्यात ठेवा. जवळपास २४ ते ४८ तास फोन तांदळात ठेवा.

**स्टेप ६** : जर तुमच्या फोनमध्ये जास्त पाणी गेले नसेल तर फोन सुरू होईल. जर फोन सुरू झाला नसेल तर फोन सर्व्हिस सेन्टरमध्ये जा आणि फोन दुरुस्ती करण्यासाठी द्या.

आता पावसाळा सुरू होणार आहे, त्यामुळे फोनची अधिक काळजी घेणे गरजेचे आहे. जर तुम्हाला पावसाळ्यात फोन पाण्यापासून सुरक्षित ठेवायचा असेल तर वॉटरप्रूफ कव्हर वापरा!

# आज जागतिक पवन दिन

**निमित्त**



आज जगभरात जागतिक पवन दिवस साजरा केला जात आहे. याला जागतिक पवन दिवस किंवा वर्ल्ड विंड डे असेही म्हणतात. हा जगभरातील कार्यक्रम आहे, जो दरवर्षी १५ जून रोजी होतो. पवनऊर्जा आणि त्याचा उपयोग याबद्दल जागरूकता वाढवणे हा या दिवसाचा उद्देश आहे. पवन ऊर्जेचे महत्त्व आणि ते जग कसे सुधारू शकते यासाठी हा दिवस जगभरात साजरा केला जातो. हवेशिवाय जीवन कसे असेल याचा विचार करणेही अशक्य वाटते. हवा असेल तर जीवन आहे. आजही जगभरातील शास्त्रज्ञ इतर अनेक ग्रहांवर हवा शोधत आहेत. जागतिक पवन दिनानिमित्त ७५ हून अधिक देशांमध्ये कार्यक्रम आयोजित केले जातात.

### इतिहास

ग्लोबल विंड डेचे आयोजन युरोपियन विंड एनर्जी असोसिएशन आणि ग्लोबल विंड एनर्जी कौन्सिल आणि राष्ट्रीय संघटनांद्वारे केले जाते. या दिवसाची स्थापना सामान्य लोकांना पवन ऊर्जा आणि त्याचे फायदे जाणून घेण्यासाठी करण्यात आली. हा दिवस पहिल्यांदा २००७ मध्ये युरोपियन विंड एनर्जी असोसिएशन आणि ग्लोबल विंड एनर्जी कौन्सिलने साजरा केला. त्यानंतर २००९ मध्ये तो जागतिक स्तरावर साजरा करण्याचा निर्णय घेण्यात आला. २००९ पर्यंत जागतिक पवन दिवस किंवा ग्लोबल विंड डे नव्हता. २००९ पासून हा दिवस अधिक सर्वसमावेशक बनला आणि लोकांपर्यंत पोहोचवला गेला आहे.

### महत्व

आपण अशा काळात जगत आहोत जिथे जगभरात ग्लोबल वार्मिंगचा धोका आहे. अशा परिस्थितीत पवन ऊर्जेसारख्या उर्जेचा कार्यक्षमतेने वापर करणे महत्त्वाचे ठरते. सश्रेलरश्रुळपववरू.ीस नुसार, पवन ऊर्जा सध्या एक परिपक्व आणि मुख्य प्रवाहातील तंत्रज्ञान आहे. २०१५ मध्ये १०० अब्ज डॉलरपेक्षा जास्त गुंतवणुकीसह हे जगातील सर्वांत वेगाने वाढणाऱ्या औद्योगिक क्षेत्रांपैकी एक आहे.

एकट्या एण मध्ये, पवन उद्योगाने गेल्या वर्षभरात गॅस आणि कोळसा यांच्या तुलनेत जास्त क्षेत्र व्यापलं आहे. हे क्षेत्राच्या १५ टक्के विजेच्या वापराची पूर्तता करण्यासाठी पुरेशा संचयी स्थापित क्षमतेसह केले जाते, जे ८७ दशलक्ष घरांना वीज पुरवण्याइतके आहे. त्यामुळे या दिवसाचे महत्त्व खूप मोठे आहे, अधिकाधिक लोकांना पवनऊर्जेची माहिती व्हावी.

भारतात वाढणारी लोकसंख्या पाहता भविष्यात मोठ्या प्रमाणात उर्जेची गरज भासणार आहे. देशानेही पवन उर्जेचे महत्व ओळखलं आहे. भारत पवन उर्जेच्या बाबती जगात चौथ्या क्रमांकावर आहे. ज्यात सर्वाधिक योगदान तमिळनाडू राज्याचे आहे. देशातील पवन उर्जेच्या माध्यमातून ४० गीगा वॅट उर्जेचे उत्पादन केले जाते.

जागतिक पवन ऊर्जा दिवस आपण साजरा करण्यामागचे कारण कारण की हा एक नैसर्गिक स्त्रोत आहे जो कधीही न संपणारा अक्षय ऊर्जा स्त्रोत आहे. पवन ऊर्जा ही खूपच प्राचीन काळापासून वापरात आलेला ऊर्जेचा एक प्रकार आहे आणि याचे महत्त्व असे टिकून ठेवण्यासाठी दरवर्षी १५ जून रोजी जागतिक पवनऊर्जा दिवस साजरा केला जातो.

**(साभार : इंटरनेट)**

**क्लिक...क्लिक...!**



**मुरूड : आजपासून शाळा सुरू होत आहे. पावसाळासुद्धा सुरू झाला आहे. शालेय विद्यार्थ्यांना कोणताही त्रास व पावसाचे पाणी शाळेच्या आत शिरू नये यासाठी प्रत्येक शाळेने छप्पर दुरुस्ती करण्याकडे अधिक लक्ष पुरविले आहे. नांदगाव हायस्कूल येथेसुद्धा कौलांची व्यवस्थित मांडणी करण्यात आली असून विद्यार्थ्यांच्या स्वागतासाठी शाळा सज्ज झाली आहे.** (छाया : संजय करडे)

## आरोग्य प्रहर

# अननस खाल्ल्याने शरीराला अनेक फायदे



अननस खाल्ल्याने शरीराला अनेक फायदे होतात. अननस लठ्ठपणा दूर करतो आणि प्रतिकारशक्ती मजबूत करतो. अननसाचा आपल्या आहारात समावेश जरूर करावा.

**पचनसंस्था सुरळीत करते** – उन्हाळ्यात अनेकदा पचनसंस्था नीट काम करत नाही. गॅस ॲसिडिटी, डायरिया, अपचन, बद्धकोष्ठता यांसारख्या समस्या उद्भवतात. या समस्यांवर मात करण्यासाठी सकाळच्या नाश्त्यात अननसाचा ज्यूस प्या, पोट चांगले स्वच्छ होईल आणि ताजेपणा राहील.

**हाडे मजबूत** – हाडांच्या मजबुतीसाठी तुम्ही अननसाचा रसदेखील पिऊ शकता. त्यात कॅल्शियम, फॉस्फरस, मँगनीज असल्याने दात आणि हाडे मजबूत होतात.

**हृदयविकारात फायदेशीर** – अननसमध्ये अँटी-ऑक्सिडेंट आणि व्हिटॅमिन सी असते, जे हृदयरोगापासून तुमचे संरक्षण करते, जे लोक हाय बीपीच्या समस्येने त्रस्त आहेत त्यांनी त्यांच्या आहारात अननसाचा समावेश जरूर करावा. यामुळे हृदयविकाराचा धोका कमी होऊ शकतो.

**डोळ्यांसाठी फायदेशीर** – अननसाचा रस डोळ्यांसाठीही खूप फायदेशीर आहे. यामध्ये व्हिटॅमिन ए आणि अँटीऑक्सिडंट्स असतात, ज्यामुळे डोळ्यांच्या समस्या दूर होतात. त्याचा रस लहान मुलाला सुरुवातीपासूनच द्यावा, म्हणजे लहान वयातच त्याची दृष्टी कमजोर होणार नाही.

**त्वचेसाठी महत्त्वाचे** – अननस खाणे किंवा त्याचा रस पिणे त्वचेशी संबंधित समस्यांमध्येही फायदेशीर ठरू शकते. त्यामुळे मुरुमांबरोबरच चट्टेही कमी होतात. यामध्ये असलेले व्हिटॅमिन सी त्वचा सुधारण्यास मदत करते, त्वचेतील मृत त्वचा काढून टाकून त्वचा सुधारते.

**रोगप्रतिकारशक्ती वाढवा** – अननसाचा रस अँटिऑक्सिडंट्स आणि व्हिटॅमिन सीचा समृद्ध स्त्रोत आहे ज्यामुळे तुमची प्रतिकारशक्ती वाढते. तुम्हाला उर्जेने परिपूर्ण ठेवते. हंगामी आजारांचा धोका दूर करते.

**वजन कमी करण्यासाठी उपयुक्त** – ज्यांना वजन कमी करायचे आहे त्यांनी अननसाच्या रसाचाही आहारात समावेश करावा. यामध्ये कॅलरी किंवा फॅट नसते, यासोबतच तुम्हाला भरपूर ऊर्जा मिळते.

# पेणच्या रावे गावचा विकास वेगात

## आमदार रविशेठ पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली विविध कामे

**पेण : रामप्रहर वृत्त**

पेण तालुक्यातील ग्रुप ग्रामपंचायत रावे येथील म्हसोबा देवस्थान त्याचे लोकार्पण व म्हसोबा देवस्थान येथे साको बांधणे कामाचे भूमिपूजन आमदार रविशेठ पाटील व दक्षिण रायगड जिल्हा उपाध्यक्ष वैकुंठ पाटील यांच्या हस्ते झाले. या वेळी भारतीय जनता पक्षाचे तालुकाध्यक्ष श्रीकांत पाटील, रावे गावच्या सरपंच, सदस्य, म्हसोबा देवस्थान मच्छीमार सोसायटीचे ग्रामस्थ, महिला मंडळ मोठ्या संख्येने उपस्थित होते.





भारतीय जनता पक्षाचे पेण पाली सुधागडचे कर्तव्यदक्ष आमदार रवीशेठ पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पेण तालुक्यात विविध विकास कामे सुरू आहेत, रावे गावाचा विकास करण्यासाठी अनेक विकास कामे करण्यात आली आहेत. रावे गावातील मच्छीमार ग्रामस्थांची जागृत म्हसोबा देवस्थानासाठी रस्ता आमदार रवीशेठ पाटील यांच्या आमदार निधीतुन करावे, अशी मागणी ग्रामस्थांची होती त्यासाठी आमदार रविशेठ पाटील यांनी स्वतःच्या जागेतून रस्ता देऊन तसेच ग्रामस्थांना स्वतःच्या जागेत शौचालयासाठी जागा देऊन म्हसोबा देवस्थानासाठी साडे सत्तावीस लाख रुपये तसेच साको बांधण्यासाठी पंधरा लाखाचा निधी देण्यात आला. या वेळी म्हसोबा देवस्थानासाठी रविशेठ पाटील यांनी रस्त्याचे लोकार्पण व साकव बांधण्याचे कामाचे शुभारंभ करताना गावकऱ्यांनी मोठ्या वाजत गाजत मिरवणूक काढण्यात आली. तसेच रविशेठ पाटील यांचे आभार मानले.

या वेळी आमदार रविशेठ पाटील यांनी आपल्या भाषणात सांगितले की गावामध्ये राजकारण आणू नका सर्व ग्रामस्थांनी एकोपाने राहून आपले गावाचा विकास करणाऱ्याची मागे खंबीरपणे उभे राहा.

भाजपच्या माध्यमातून गावोगावी अनेक विकासात्मक कामे होत आहेत. पेण तालुक्यातील इतर गावांमध्येही विकासाचा वेग वाढणार असल्याचे या वेळी रविशेठ पाटील म्हणाले.

### विकासाची गंगा आणत राहणार -श्रीकांत पाटील

***या वेळी भाजप तालुका अध्यक्ष श्रीकांत पाटील यांनी आमदार रविशेठ पाटील साहेब आणि भारतीय जनता पक्षाच्या माध्यमातून रावे येथील म्हसोबा देवस्थान साठी अनेक वर्षापासून असलेली मागणी स्वतःची जागा देऊन रस्ता बांधण्यासाठी वीस लाखाचा निधी तसेच पुढील कामासाठी साडेसात लाख रूपये व साकव बांधण्यासाठी पंधरा लाख निधी देऊन गावाच्या विकासात भरच टाकली आहे. असेच अनेक कामे करत आपल्या गावामध्ये विकासाची गंगा आणत राहणार आणि या गावाचा विकास करत राहणार असे सांगितले.***

# टँकरच्या धडकेत तरुणाचा मृत्यू

**महाड : प्रतिनिधी**

मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गावर महाड तालुक्यातील गांधारपाले या गाव हद्दीत रस्ता ओलांडत असणारा २३ वर्षीय तरुण एका टँकरच्या धडकेत जागीच ठार झल्याची घटना घडली आहे.

प्रेम उर्फ गण्या लक्ष्मण पवार (वय २३, रा. गंधारपले) हा तरुण मंगळवारी रात्री ११ वाजण्याच्या सुमारास त्याच्याच गाव हद्दीत मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्ग ओलांडत होता. याच दरम्यान पोलादपूर ते मुंबईच्या दिशेने जाणाऱ्या टँकरची जोराची धडक बसली आणि हा तरुण जागीच ठार झाला. अपघात ठिकाणी श्री काळकाईदेवी मंदिरासमोर रस्त्याचे काम चालू असलेल्या व वाहतुकीस बंद असलेल्या रस्त्याने बेजबाबदार पणे टँकर नेत या तरुणाला धडक दिली.

**अपंग पालकांनी गमावला एकमेव आधार**

हा तरुण आपल्या अपंग आई-वडिलांचा एकुलता एक आधार होता. या अपघातानंतर गांधारपाले ग्रामस्थांनी काही काळ रस्त्यावर उतरून वाहतूक बंद केली होती. ठेकेदार कंपनीने या रस्त्यावर वाहतूक बंद असल्याचे फलक अथवा बॅरिगेट्स लावले नसल्याचे ग्रामस्थांचे म्हणणे होते. या वेळी पोलिसांनी वेळीच हस्तक्षेप करून ग्रामस्थांना समजावून महामार्गावरील वाहतूक सुरळीत केली.

अपघातानंतर चालकाने आपल्या ताब्यातील टँकर घेऊन पळ काढण्याचा प्रयत्न केला, मात्र तो अयशस्वी ठरला. घटनास्थळी महाड शहर पोलिसांनी धाव घेत टँकर आणि चालक बाळकृष्ण उर्फ बाळकिशन झुलाई यादव याला ताब्यात घेत चालकावर गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास महाड शहर पोलीस करीत आहेत.

## निवडक

### खालापुरात दाखले वाटप शिबिर




**खालापूर :** रायगड जिल्हाधिकारी योगेश म्हसे, उपविभागीय अधिकारी अजीत नैराळे यांच्या मार्गदर्शनाखाली खालापूर तहसीलदार आयुब तांबोळी व त्यांच्या कर्मचारी वृंदांनी शालेय विद्यार्थ्यांना उपयोगी ठरणारे दाखले वाटप शिबिर घेण्यात आले. खालापूर तहसील कार्यालयाच्या आवारात असणाऱ्या नेताजी पालकर सभागृहात मंगळवारी हे शिबिर झाले. या शिबिरात जातीचे दाखले-११३, उत्पन्न दाखले-१००, डोमेसीयल-९, नवीन मतदार नोंदणी-१० अशा दाखल्यांचे वाटप केले. या शिबिरात मंडळ अधिकारी संदेश पानसरे, तलाठी प्रतीक बापर्डे व कर्मचारी यांनी विशेष परिश्रम घेतले.

### सिद्धी गोरेगावकरचे यश



**माणगाव :** श्रद्धा इंग्लिश मिडीयम स्कूलची विद्यार्थिनी सिद्धी गोरेगावकर या गरीब कुटुंबातील मुलीने दहावी शालांत परीक्षेत ८०.६० टक्के गुण संपादन करून उत्तीर्ण झाली आहे. तिने मिळविलेल्या या उज्वल यशाबद्दल तिचे सर्व स्तरांतून कौतुक होत आहे. आपल्या या यशात आपले आई-वडील यांची मेहनत व शिक्षक वर्ग यांचे मोलाचे ठरले असल्याचे सिध्दीने सांगून यापुढे अकरावी विज्ञान शाखेत प्रवेश घेणार असल्याचे सांगितले. तिच्या यशाबद्दल माणगाव शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. राजीव साबळे, माजी नगराध्यक्ष आनंदशेठ यादव, सामाजिक कार्यकर्ते संजयअण्णा साबळे, रवींद्र मोरे, नगराध्यक्ष ज्ञानदेव पवार, उपनगराध्यक्ष राजेश मेहता, श्रद्धा इंग्लिश स्कूलच्या मुख्याध्यापिका हेगडे, शाळेचे सर्व शिक्षक वर्ग, शिक्षकेत्तर कर्मचारी, नगरसेवक दिनेश रतवडकर, युसुफ शेख, युनूस पिलपिले यांनी अभिनंदन केले.

### शिवाजी राठोड यांना सेवानिरोप



**चौक :** चौकचे कृषी सहाय्यक अधिकारी शिवाजी राठोड यांची रोहा येथे पदोन्नतीने बदली झाल्याने एक कुशल आणि कार्यक्षम अधिकारी यांची कमतरता कायम राहील, अशी भावना चौक परिसरातील शेतकरी बंधूंनी व्यक्त केली. चौक परिसरात कृषि विभागाच्या योजना तळागाळातील शेतकऱ्यांपर्यंत पोचविण्यासाठी कसोशीने प्रयत्न केले, कृषी विभागाची खरी ओळख करून दिली. परिसरातील शेतकऱ्यांनी त्यांना निरोप देऊन गौरविण्यात आले. या वेळी सुभाष मुंढे, शिवाजी ठाकूर, कल्पेश गुरव, योगेश फाटे व इतर शेतकरी उपस्थित होते.

### जनार्दन लबडे यांचा सेवानिवृत्ती सत्कार



**चौक :** महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीमध्ये ३४ वर्षे उत्कृष्ठ कार्य करून जनार्दन काळूराम लबडे हे नियत नियमानुसार सेवा निवृत्त झाल्याने त्यांचा सत्कार कार्यालयातील अधिकारी, कर्मचारी, नागरिक व व्यापारी वर्गाने करून त्यांना निरोप दिला. या वेळी अनेकांचे डोळे भरून आले.अनेकांनी त्यांच्या कार्याची दखल घेऊन स्तुतीसुमने उधळली, त्यांच्या निरोप समारंभ कार्यक्रमास अभियंता बन, कनिष्ठ अभियंता स्वप्निल मगरे व्यापारी विजय ठाकरे, मोहन लबडे, छगन ओसवाल, विनायक देशमुख, पत्रकार अर्जुन कदम, अनेक सरपंच, उपसरपंच, व्यापारी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# रोह्यात पहिल्याच पावसात विजेचा लपंडाव

**रोहे : प्रतिनिधी**

रोहा शहरासह तालुक्यातील ग्रामीण भागात गेली चार ते पाच दिवस विजेचा लपंडाव सुरू आहे. विज सातत्याने खंडित होत असल्याने नागरिकांतून तीव्र नाराजी व्यक्त केली जात आहे. या विजेचा लपंडावामुळे शहरासह ग्रामीण भागातील छोटे व्यवसायिकांना त्रास सहन करावा लागत आहे.

सध्या पावसाची सुरुवात झाली असली तरी पाऊस अधून मधून पडत आहे. मध्येच पाऊस मध्येच ऊन अशी अवस्था गेली दोन दिवस पावसाचे दिसून येत आहे. पाऊस आल्याने शेतकऱ्यांनी आपल्या कामाला सुरुवात केली आहे. एकीकडे पावसाने सुरुवात केली असता नागरिकात समाधान व्यक्त होत असताना दुसरीकडे वीज मात्र सातत्याने खंडित होत असल्याने नागरिकांतून तीव्र नाराजी व्यक्त केली जात आहे. गेली चार दिवस सातत्याने रोहा शहराचा ग्रामीण भागात वीज खंडित होताना दिसून येत आहे. त्यामुळे पहिल्याच पावसात ही परिस्थिती असेल पुढे जोरदार पाऊस कोसळल्यास अवस्था बिकट होईल असे नागरिकांतून बोलले जात आहे.

वीज मंडळाने सातत्याने शट डाऊन घेऊन काम केले आहे.शट डाऊन घेऊन काम केले असताना सुद्धा वीज खंडित होत असल्याचे दिसून येत आहे.रोहा शहरासह तालुक्यातील ग्रामीण भागात सातत्याने वीज खंडित झाल्याने छोट्या व्यवसायिकांना व उद्योजकांना त्याचा त्रास होत आहे. विशेषता डेरी, लॉन्ड्री, पिठाचीचक्की, सायबर कॅफे, कॉम्पुटर इन्स्टिट्यूट यासह अन्य छोट्या मोठ्या व्यवसायिकांना त्याचा त्रास होत आहे. वीज मंडळांनी या समस्येची गंभीर दखल घेत योग्य ती उपाययोजना करावी, अशी मागणी नागरिकातून होत आहे. पुढील पावसाळ्याचे दिवस पाहता विना खंडित विजेची गरज नागरिकांना आहे.

# माणगावमध्ये विद्यार्थ्यांना मार्गदर्शन

**माणगाव : प्रतिनिधी**

युवा क्रांती संघ करिअर डेव्हलपमेंट सेंटरच्या माध्यमातून शैक्षणिक वर्ष २०२२-२३मध्ये इत्यादी दहावी-बारावीमध्ये उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांचा गुणगौरव समारंभ व मार्गदर्शन कार्यक्रम झाला. संस्थेच्या वतीने उत्तीर्ण विद्यार्थ्यांचा गौरवपत्र, बॅग, नोटबुक, पाऊच व कॅप देऊन गुणगौरव करण्यात आला.



प्रमुख वक्ते मयुरा सावी आणि निखील लता गजानन यांनी विद्यार्थ्यांना मिडीया साक्षरता व करिअर या विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले, तसेच सचिव सुनील गायकवाड यांनी विद्यार्थ्यांना दहावी-बारावी नंतर उपलब्ध असलेल्या विविध करिअर संधीविषयी माहिती दिली.

या कार्यक्रमाला जितेंद्र कांबळे, सुभाष कासे, गौतम बस्ते, निर्मलकुमार घुंकिकार, ॲड. रूपाली घुंकिकार, अर्चना सुभाष कासे, नंद साळवी, मधुकर सकपाळ, रवींद्र मोरे, प्रकाश गायकवाड, किरण मोरे, चिंतामण मोहिते, सुर्यकांत कासे, प्रकाश कासे, कृष्णाजी राव, सुरेश म्हस्के, नथूरामजी गवाणे, बाळकृष्ण गायकवाड, मंगेश सोनावणे, दामोदर मोहिते, सचिन सकपाळ, वैभव यादव, दिनेश इंगळे, भरत खंडारे, संतोष शिर्के तसेच विद्यार्थी उपस्थित होते.

# मुरूड तालुक्यातील आदिवासीवाड्यांना अखेर पाणीपुरवठा

**मुरूड : प्रतिनिधी**

मजगाव आरावघर-घानवड आदिवासीवाड्यांमध्ये तहानलेल्या नागरिकांना पायपीट करून तुटलेल्या अर्धवट विहीरीतील दुषित पाणी प्यावे लागत होते. यामुळे आरोग्याचा प्रश्न ऐरणीवर असून तातडीने पाणीपुरवठा करण्यात न आल्यास सामाजिक कार्यकर्ते जनार्दन काबूकर आदिवासी बांधवांच्या वतीने तहसील कार्यालयासमोर आंदोलन करण्याचा इशारा दिला होता. मुरुड तहसीलदार रोहन शिंदे यांनी सदर आंदोलनाची तातडीने दखल घेऊन याठिकाणी टँकरने पाणीपुरवठा करण्याचा निर्णय घेऊन तो तातडीने अमलात आणल्या ने येथील आदिवासी बांधवांनी समाधान व्यक्त केले.



शासनाने जल जीवन मिशन योजना राबवूनसुद्धा मे महिन्यात कूपनलिका कोरड्या पडल्या आहेत. मुळात पाऊसच उशिरा पडल्याने सर्व पाण्याची स्तोत्र आटली आहेत. त्यामुळे मुरुड तालुक्यातील ग्रामीण भागात पाण्याची तीव्र टंचाई निर्माण झाली आहे. घानवड आदिवासीवाडीतील महिलांना अनेक दिवसांपासून जवळील नदीतील डवऱ्यातील (खड्ड्यातील) पाणी प्यावे लागत असून आरावघर आदिवासी वाडीतील कूपनलिकेला पाणी नसल्याने जवळ पायपीट करून तुटलेल्या अर्धवट विहीरीतील दुषित पाणी प्यावे लागत आहे. यामुळे पाणी टंचाई बरोबर येथील आदिवासी बांधवांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला आहे.

याबाबत आदिवासी बांधव सखाराम तफीसर यांनी सामाजिक कार्यकर्ते जनार्दन काबूकर यांच्याशी संपर्क साधून समस्या कथन केली असता घानवड आदिवासी वाडीतील महिलांना जवळील नदीतील डवऱ्यातील अशुद्ध पाणी प्यावे लागत असल्याचे वृत्त समजताच काबूकर यांच्या समवेत प्रत्यक्ष जागेवर भेट देऊन तहसीलदार रोहन शिंदे यांच्या निदर्शनास आणून दिले असता त्यांनी संबंधित मंडळ अधिकारी व तलाठी अरविंद देशमुख, वरदा मयेकर यांना आदेश देण्यात येऊन तात्काळ याठिकाणी टँकरद्वारे पाणीपुरवठा करण्यात आला.

या वेळी जनार्दन काबूकर, सखाराम तफीसर व आदिवासी बांधवांनी तहसीलदार रोहन शिंदे यांचे आभार मानले आहेत. सावली ग्रामपंचायतमधील मिठागर भागाला सुधा टँकरद्वारे पाणीपुरवठा केला जात असल्याची माहिती या वेळी महसुल विभागमार्फत देण्यात आली आहे.

# बोरघाटात ट्रेलर आडवा झाल्याने वाहतूक कोंडी



**खालापूर : प्रतिनिधी**

मुंबई पुणे द्रुतगती महामार्गावर ट्रेलर चालकाचा नियंत्रण सुटल्याने डिव्हायडरवर आदळून आडवा झाला. या घटनेने ट्राफिक एक तास पूर्णपणे ठप्प झाली होती. याचा फायदा घेत काही वाहनचालकांनी आपल्या वाहनात झोप काढल्या. आयबी पेट्रोलिंग देवदूत यंत्रणा आणि महामार्ग पोलिसांनी शिकस्त करून ट्रेलर बाजूला केला आहे. महामार्ग वाहतूक पोलिसांनी वाहनात झोपलेल्या वाहनचालकांना वाहने सुरू करण्यासाठी भाग पाडत वाहतूक कोंडी सोडवली.

वाहने रस्त्यामधेच बंद करून ठेवत चालकांनी वाहनांमधेच झोपा काढल्या. डुलकी एवढी भयान होती की, आडवा झालेला ट्रेलर पोलिसांनी क्रेनच्या साह्याने बाजूला काढत वाहतूक कोंडी सोडवली, मात्र वाहने पुढे का जात नाहीत, असा सवाल बोरघाट पोलिसांना पडला. त्याची शहानिशा करण्यासाठी मार्गावर उभ्या असणाऱ्या वाहनांची झाडाझडती घेतली. त्यामध्ये २० हून अधिक वाहन चालकांनी आपली वाहने रस्त्यामधेच बंद करून झोपा काढत असल्याचे समजले, मात्र वाहतूक पुर्ववत करण्यासाठी महामार्ग पोलिसांनी साखरझोपेत असणाऱ्या वाहनचालकांच्या तोंडावर पाणी शिंपडून जागे केले त्यानंतर वाहतूक कोंडी सुटली. झोपाड्या चालकांमधे कार, ट्रक टेम्पो चालकांचा सामावेश होता. ही घटना पहाटे ५ वा सुमारास घडली.

# पोलादपूरला मिळाले पूर्णवेळ तहसीलदार

**पोलादपूर :** पोलादपूर तहसीलदार पदावर कायमस्वरूपी पूर्णवेळ व्यक्ती नसल्याने खूपच गैरसोय झाली होती. सव्वा महिन्यांनंतर पोलादपूर तालुक्याला कपिल घोरपडे यांनी तहसीलदारपदाचा कार्यभार स्विकारला आहे.

दिप्ती देसाई यांची बदली सिंधुदूर्ग वैभववाडी येथे झाल्यानंतर तब्बल महिनाभर नायब तहसीलदार समीर देसाई यांच्याकडे प्रभारी तहसीलदारपदाचा कार्यभार सोपविण्यात आला होता. यानंतर समीर देसाई यांचीही चिपळूण येथे बदली झाल्यानंतर रिक्त झालेले पोलादपूरचे तहसीलदारपद प्रभारी परिविक्षाधीन पूनम कदम यांच्याकडे काही दिवस सोपविण्यात आले. अखेर नवीन तहसीलदार म्हणून कपिल घोरपडे यांची नेमणूक झाली आणि मंगळवारी (दि. १३) त्यांनी कार्यभार स्विकारला.

तहसील कार्यालयातर्फे नवीन तहसिलदार कपिल घोरपडे यांचे स्वागत करण्यात आले.

# धाटाव एमआयडीसीत दोन्ही बाजूंनी गाड्यांची पार्किंग

**रोहे : प्रतिनिधी**

धाटाव औद्योगिक क्षेत्रातील अंतर्गत रस्त्यावर विविध कारखान्यात मालवाहू करणाऱ्या गाड्या दोन्ही बाजूने उभे राहिल्याने अपघात होण्याची शक्यता आहे. दोन्ही बाजूंनी गाड्या उभ्या राहत असल्याने अन्य वाहनांना जाण्यासाठी रस्ता आरुंद मिळत असल्याने अपघात होण्याची दाट शक्यता आहे. या वाहनांना उभ्या करण्यासाठी एमआयडीसी ने स्वतंत्र वाहनतळ निर्माण करण्याची आवश्यकता आहे.



अपघाताची शक्यता

रायगड जिल्ह्यातील सर्वांत जुनी म्हणुन रोहा तालुक्यातील धाटाव औद्योगिक क्षेत्र ओळखले जाते. या औद्योगिक क्षेत्रात सध्या ३५ च्या आसपास रासायनिक कारखाने चालू आहेत. या रासायनिक कारखान्यातून निघणाऱ्या कच्चा व पक्का माल नेण्यासाठी व या कारखान्यात आणण्यासाठी सातत्याने ट्रान्सपोर्ट चे अथवा कंपनीचे मालवाहू ट्रक व अन्य गाड्या ये जा करीत असतात. या वाहनांना जोपर्यंत गेट पास मिळत नाही. तोपर्यंत ही वाहने औद्योगिक क्षेत्रातील कारखान्यासमोर असलेल्या रस्त्यावर उभी केली जातात. या जास्त प्रमाणात गाड्या असल्याने या गाड्या रस्त्याच्या दोन्ही बाजूंनी उभ्या केल्या जातात. मोठ्या प्रमाणात या गाड्या रस्त्याच्या दोन्ही बाजूने उभे राहत असल्याने या रस्त्यावरून तिसरी गाडी जाण्यासाठी त्या गाडीला कसरत करावी लागते. समोरून येणारी गाडी न दिसल्यामुळे अपघात होण्याची दाट शक्यता आहे.

दुसरे महत्त्वाचे म्हणजे या औद्योगिक क्षेत्रातील कारखान्यात काम करणारे कामगारांना दिवसा व रात्रीच्या वेळी कामावर येताना व कामावरून घरी जाताना या उभ्या असलेल्या ट्रकचा त्रास सहन करावा लागतो. रात्रीच्या वेळी दोन ट्रकच्या मधून येणारे गाडी दिसत नाही. त्यामुळे दोन्ही बाजूने उभे असलेले ट्रक अपघाताला निमंत्रण देत असल्याचे दिसून येते.

मागील काही वर्षांपूर्वी अशा रस्त्यावर उभ्या असलेल्या गाड्यांमुळे अपघात झालेला आहे. गेली कित्येक वर्षापासून औद्योगिक क्षेत्रात या वाहनांसाठी स्वतंत्र वाहनतळ असावे अशी मागणी जोर धरत होती, परंतु या वाहनांसाठी अद्याप स्वतंत्र वाहनतळ निर्माण झाले नाही.

# जय श्रीराम घोषणेला विरोध करणाऱ्या शाळेला भाजपचा दणका

## पदाधिकाऱ्यांनी दिले मुख्याध्यापकांना निवेदन



**नवी मुंबई : बातमीदार**

वाशी येथील सेक्टर १६ ए मधील सेंट लॉरेन्स हायस्कूल या इंग्रजी माध्यमाच्या शाळेत दहावीच्या विद्यार्थ्यांनी 'जय श्रीराम' घोषणा दिल्यामुळे त्यांना शाळेतून काढून टाकल्याचा प्रकार उघडकीस आला. याबाबत निषेध व्यक्त करण्यासाठी भारतीय जनता पक्ष, सकल हिंदू समाज, श्री शिवप्रतिष्ठान हिंदुस्थान या संस्थांचे पदाधिकारी तसेच स्थानिक नागरिकांसमवेत शाळेच्या प्राचार्यांची भेट घेऊन निवेदन दिले.

सेंट लॉरेन्स शाळेत दहावीच्या वर्षातील दहा मुले बाथरूममध्ये गेली होती. त्यावेळी एकाने गंमत म्हणून जय श्रीराम म्हटले, मात्र त्याला प्रतिसाद देत इतर विद्यार्थ्यांनी जोरजोरात जय श्री राम म्हटले. हा आवाज तेथील काही शिक्षकांना ऐकू आला. शिक्षकांनी विद्यार्थ्यांना विचारणा केल्यावर चार जणांनी उर्वरित सहा जणांची नावे शिक्षकांना सांगितली. शाळा प्रशासनाने तातडीने निर्णय घेत या सहा विद्यार्थ्यांना शाळेतून काढण्याचे पालकांना कळवले, मात्र पालकांनी विनवणी केल्यावर सहा पैकी चार जणांचे निलंबन मागे घेतले तर उर्वरित दोघांचा प्रश्न कायम आहे. याबाबत नवी मुंबई पालिका शिक्षणाधिकारी अरुणा यादव यांच्याशी याविषयी संवाद साधण्याचा प्रयत्न केला असता त्यांनी नंतर फोन करते असे म्हणत बोलण्यास नकार दिला.

सेंट लॉरेन्स हायस्कूल, सेक्टर १६ ए मधील सहा ते आठ विद्यार्थांना जय श्रीरामच्या घोषणा दिल्याबद्दल शाळेतून काढून टाकल्याची घटना घडली. याबाबत निषेध व्यक्त करण्यासाठी भारतीय जनता पक्ष, सकल हिंदू समाज, श्री शिवप्रतिष्ठान हिंदुस्थान या संस्थांचे पदाधिकारी तसेच स्थानिक नागरिकांसमवेत शाळेच्या प्राचार्यांची भेट घेऊन निवेदन दिले. या वेळी भाजपाचे सामाजिक कार्यकर्ते विजय वाळुंज तसेच पदाधिकारी उपस्थित होते. या वेळी प्राचार्यांनी विद्यार्थ्यांचे निलंबन आम्ही करणार नाही, असे आश्वासन उपस्थितांना दिले.

### ...अन्यथा निषेध आंदोलन करण्याचा इशारा

जर विद्यार्थ्यांसोबत अन्याय झाल्यास किंवा विद्यार्थ्यांना शाळेतून काढल्यास भारतीय जनता पक्ष, सकल हिंदू समाज आणि श्री शिवप्रतिष्ठान हिंदुस्थान संघटनेचे कार्यकर्ते तसेच स्थानिक नागरिक व कार्यकर्ते, मोठ्या प्रमाणात निषेध आंदोलन करू, असा इशारा स्थानिक भाजप पदाधिकारी विजय वाळुंज यांनी दिला.

# मोदी सरकारचे कार्य जनतेपर्यंत पोहचवा –आमदार गणेश नाईक



**नवी मुंबई : बातमीदार**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या लोककल्याणकारी सरकारला ९ वर्षे पूर्ण झाल्याबद्दल भारतीय जनता पक्षाच्या वतीने देशभर विशेष महाजनसंपर्क अभियान राबविण्यात येते आहे. ऐरोली विधानसभा मतदारसंघासाठी आमदार गणेश नाईक यांच्या वतीने या अभियानांतर्गत समाज माध्यमांवरील प्रभावशाली व्यक्तींचा मंगळवारी (दि. १३) मेळावा कोपरखैरणे येथे आयोजित करण्यात आला होता.

या मेळाव्यामध्ये उपस्थितांना मार्गदर्शन करताना आमदार नाईक यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मागील नऊ वर्षांत केलेला देशाचा सर्वांगीण विकास आणि लोककल्याणकारी योजनांचा करोडो नागरिकांना झालेला लाभ याविषयीची माहिती समाज माध्यमांवरील प्रभावशाली व्यक्तींनी जनतेपर्यंत पोहचवावी, असे आवाहन केले.

माजी खासदार डॉ. संजीव नाईक, ज्यांच्या मार्गदर्शनाखाली या मेळाव्याचे यशस्वी आयोजन करण्यात आले ते माजी आमदार संदीप नाईक, माजी महापौर सुधाकर सोनवणे, स्थायी समितीचे माजी सभापती नवीन गवते, माजी विरोधी पक्षनेते दशरथ भगत, माजी नगरसेविका भारतीताई पाटील, समाजसेवक रविकांत पाटील, ज्येष्ठ कार्यकर्ते अरुण पडते, आप्पा मुळे, लोकप्रतिनिधी, भारतीय जनता पक्षाचे पदाधिकारी कार्यकर्ते आणि समाज माध्यमांवरील प्रभावशाली व्यक्तींनी विशेष करून युवक आणि युवतींनी मोठ्या संख्येने या मेळाव्याला हजेरी लावली. मेळाव्याच्या प्रारंभी मोदी सरकारच्या कामगिरीची माहिती देणाऱ्या चित्रफित दाखविण्यात आल्या.

मागील नऊ वर्षात पंतप्रधान मोदी यांच्या कार्यकाळामध्ये जगात देशाचा सन्मान वाढला असे लोकनेते आमदार नाईक म्हणाले. देशाची अर्थव्यवस्था जगामध्ये पाचव्या क्रमांकावर आली. विकसित देशांच्या तोडीस तोड आपले लष्कर झाले.देशातील कोट्यवधी नागरिकांना मोदी सरकारच्या जनकल्याणकारी योजनांचा लाभ झाला. अमेरिका इंग्लंडसह जगातील महासत्तांनी पंतप्रधान मोदी यांचे नेतृत्व मान्य केले असून विश्वनेतृत्व म्हणून निर्माण झालेली त्यांची प्रतिमा देशवासीयांना अभिमानास्पद आहे. भविष्यातही नरेंद्र मोदी हेच देशाचे नेतृत्व करतील आणि त्यांच्या नेतृत्वाखाली देशाच्या प्रगतीची गती कायम राहील, असा विश्वासही आमदार नाईक यांनी व्यक्त केला.

माजी खासदार संजीव नाईक यांनी कार्यक्रमाची प्रस्तावना करताना भारतीय जनता पक्षाने तयार केलेले सरल, नमो प डाउनलोड करण्याचा सल्ला उपस्थितांना दिला. या पच्या माध्यमातून मोदी सरकारने केलेले देश विकासाचे कार्य, देशवासीयांचे जीवन सुखी आणि समृद्ध करणाऱ्या विविध लोककल्याणकारी योजना या सर्वांची माहिती देण्यात आली आहे, असे त्यांनी सांगितले.

### कोपरखैरणेत समाजमाध्यम प्रभावकांचा मेळावा

या मेळाव्यामध्ये उपस्थित समाज माध्यम प्रभावकांचा लोकनेते आमदार गणेश नाईक यांच्या शुभहस्ते सन्मान करण्यात आला. आयपीएल समालोचक कुणाल दाते, आंतरराष्ट्रीय टॅटू कलाकार महेश चव्हाण आणि त्यांच्या पत्नी डॉक्टर स्नेहल चव्हाण, राज शिवतारे, विघ्नेश मढवी, विठ्ठल बांगर, सुवर्णपदक प्राप्त अभियंता आनंद चिन्ना पांडियन आणि त्यांचे वडील आर चिन्ना पांडियन, आर. जे. प्रदीप विचारे, उमेश म्हात्रे, किरण मस्कर, संतोष म्हात्रे, युवराज माळी, तन्वी हिंदळेकर, पूजा भोई, पल्लवी गुलाखे यांचा गौरव करण्यात आला.

## निवडक



### 'एचआयव्ही'बाधितांना शूजचे वाटप

**पनवेल :** पार्श्व महिला फाउंडेशनच्या माध्यमातून विविध सामाजिक उपक्रम सातत्याने राबवून गरीब आणि गरजूंना मदतीचा हात देण्याचे काम फाऊंडेशनच्या माध्यमातून सुरू असते. त्यापार्श्वभूमीवर पार्श्व महिला फाउंडेशनच्या माध्यमातून पनवेल परिसरातील एचआयव्ही बाधित मुलांना स्कूल शूजचे वाटप आज करण्यात आले. या वेळी उपस्थितांनी संजय जैन आणि अली भाई यांचे विशेष आभार मानले. स्कूल शूजच्या वाटपावेळी बसंती जैन, नेहा गांधी, पायल कोठारी, मयुरी परमार यांच्यासह मान्यवर उपस्थित होते. शूज मिळाल्याने मुलांच्या चेहऱ्यावर आनंद पाहायला मिळाला.

### श्री गणेश मंदिराचा वर्धापन दिन



**नवी मुंबई :** श्री गणेश मंडळ चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने शिरवणे येथील चिंचोली तलाव येथील स्वयंभू श्री गणेश मंदिराचा वर्धापन दिन सोहळा विधिवत मोठ्या धार्मिक वातावरणात साजरा करण्यात आला. या वेळी विविध धार्मिक कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते. श्री हनुमान प्रासादिक भजन मंडळ, हेदूरने येथील बुवा मनोहर भंडारी, श्री राधाकृष्ण प्रासादिक भजन मंडळाचे संदीप बुवा कडू यांचे सुश्राव्य भजन झाले. पंचक्रोशीतील श्री गणेश भक्तगणां साठी आयोजित महाप्रसादाचा लाभ हजारो भक्तगणांनी घेतला. श्री हनुमान प्रासादिक महिला मंडळ, शिरवणे भजनी कविता भोईर, प्रतिभा सुतार, तेरणा सुतार यांचेही सुश्राव्य भजन झाले. श्री गणेश मंडळ चॅरिटेबल ट्रस्टचे सचिव व माजी महापौर जयवंत सुतार यांनी भक्तगणांचे आभार मानले आहे.



**पनवेल : महापालिकेच्या माजी नगरसेविका दर्शना भोईर यांनी शहरातील स्वयंसहाय्यता महिला मंडळ आणि मार्केटचे पदाधिकारी यांच्या समस्या जाणून घेतल्या. या वेळी अंजु कोळी, साहेबराव घुमरे, आत्माराम लव्हाट, मंदा राऊत, हौसा सुरते आदी उपस्थित होते. दर्शना भोईर नेहमीच मार्केटमधील व्यापारी वर्गाच्या समस्या वेळोवळी जाणून घेत असतात. त्यानुसार त्या संबंधित प्रशासनाकडे पाठपुरावा करून त्यांच्या समस्या सोडवितात.**

# पाण्याच्या नियोजनसाठी विशेष बैठक



**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबईचा झपाट्याने होणारा विकास लक्षात घेता सध्याच्या साधारणत: १७.५ लक्ष लोकसंख्येला पुरेशा प्रमाणात पाणीपुरवठा होत असला तरी भविष्याचा वेध घेता वाढीव जलस्त्रोतांची आवश्यकता भासणार आहे. यादृष्टीने नव्या जलस्त्रोतांचा शोध घेण्यासाठी महापालिका आयुक्त राजेश नार्वेकर यांनी पुढाकार घेतला असून त्याबाबत गठीत केलेल्या विशेष समितीची बैठक आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली झाली. या बैठकीत विविध जलस्त्रोतांच्या शक्यतांवर सांगोपांग चर्चा करण्यात आली.

आयुक्त नार्वेकर यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या विशेष बैठकीस समितीचे सदस्य शहर अभियंता संजय देसाई, अतिरिक्त शहर अभियंता तथा सदस्य सचिव मनोज पाटील, पाठबंधारे विभागाचे निवृत्त मुख्य अभियंता एस.एस. वाघमारे, माजी शहर अभियंता मोहन डगांवकर, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे निवृत्त मुख्य अभियंता मिलिंद केळकर, व्हिजेटीआयचे स्थापत्य आणि पर्यावरण अभियांत्रिकी प्रा. डॉ. पी.पी. भावे, आयआयटी मुंबईचे प्रा. डॉ. ज्योती प्रकाश आदी उपस्थित होते. पाण्याची गरज लक्षात घेता नव्या जलस्त्रोतांचा शोध घेणे गरजेचे आहे. याकरिता पाणी पुरवठ्याची सद्यस्थिती व भविष्यातील गरज लक्षात घेऊन अभ्यासांती नियोजन करण्याकरिता नवी मुंबई महानगरपालिकेने नियुक्त केलेल्या यश इंजिनिअरिंग यांच्यामार्फत विविध पर्यायांचे सादरीकरण समितीसमोर विचारार्थ मांडण्यात आले.

यामध्ये भूजलाचा वापर, नमुंमपा क्षेत्रानजीकच्या जलस्त्रोतांव्दारे पाणी उपलब्धता, मोरबे धरणाची उंची वाढविणे, कोंढाणे जलस्त्रोताव्दारे, बाळगंगा जलस्त्रोताव्दारे पाणी उपलब्धता, पावसाळी कालावधीत पातळगंगा नदीतील पाणी उचलणे, कुंडलीका नदीतील पाणी, भिरा धरणातील पाणी अशा अनेक पर्यायांवर पर्यायनिहाय बारकाईने विचार करण्यात आला.

### पुढील ३२ वर्षांसाठी गतिमान पावले

नवी मुंबई महापालिका क्षेत्राची लोकसंख्या सन २०५५ मध्ये ३२ वर्षांनतर साधारणत: ४४ लक्ष इतकी असेल. त्या अनुषंगाने पुढील ३२ वर्षांत नवी मुंबई महापालिका क्षेत्रातील संभाव्य लोकसंख्येला आवश्यक पाणी पुरवठा मिळावा यादृष्टीने आत्तापासूनच नियोजन करण्याची गरज लक्षात घेऊन आयुक्त राजेश नार्वेकर यांनी पुढाकार घेतला असून त्यादृष्टीने नव्या जलस्त्रोतांचा शोध घेण्यासाठी गतीमान पावले उचलण्यात येत आहेत.

# पोलीस ठाण्यात येणाऱ्या तक्रारीचे निवारणास प्राधान्य



**पनवेल : वार्ताहर**

पोलीस ठाण्यात आपल्या तक्रारी घेऊन येणाऱ्या तक्रारदाऱ्यांच्या समस्या एकूण घेऊन त्या त्वरित सोडवण्यास प्राधान्य द्यावे, असे आवाहन पनवेल परिमंडळ २चे सहाय्यक पोलीस आयुक्त अशोक राजपूत यांनी पदभार स्वीकारताना पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांना केले आहे.

पदभार स्वीकारल्यानंतर प्रसारमाध्यमांशी बोलताना पोलीस कर्मचाऱ्यांच्या कामाबाबत समाधान व्यक्त केले. त्यांनी सांगितले की, तक्रारधारकांसोबत आपुलकी वागून त्यांची नेमकी समस्या जाणून घ्यावी व त्या दिशेने पाऊल टाकावे असे आवाहन पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांना केल्याचे सांगितले.

याचबरोबर सध्या राज्यभरात सोशल मीडियावर आक्षेपार्ह पोस्ट व स्टेटस यामुळे पनवेल परिसरात कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये याबाबत खबरदारी बाळगणार असल्याचे सांगितले. तसेच सध्या वाढत असलेल्या ऑनलाईन फसवणूक बाबत नागरिकांनी सावध राहावे, असे आवाहन करतानाच फसवणूक झाल्यास त्वरित आपल्या नजीकच्या पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यास सांगितले.

दरम्यान, मावळते सहाय्यक पोलीस आयुक्त भागवत सोनावणे यांच्यावर तेथील कार्यालयीन कर्मचाऱ्यांनी पुष्पवृष्टी करून निरोप दिला.

# रसायनी ब्राह्मण संघातर्फे गुणवंतांचा सत्कार

**रसायनी : प्रतिनिधी**

रसायनी ब्राह्मण संघाने दहावी व बारावीच्या विद्यार्थ्यांचा सत्कार सोहळा सोमवारी (दि. १२) गणपती मंदिर मोहोपाडा येथे आयोजित केला होता


या वेळी उत्तीर्ण झालेल्या पाल्यांनी आणि पालकांनी तसेच सर्व सदस्यांनी या कार्यक्रमाला उपस्थितत राहून गुणवंत स्थलाना शुभ आशिर्वाद दिले तसेच मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. पळणीटकर यांनी मुलांना योग्य प्रकारे मार्गदर्शन केले. डॉ. पळणीटकर व डॉ. सौ पळणीटकर आणि डॉ. विदुला सोमण यांच्या हस्ते मुलांचा गौरव करण्यात आला.

रसायनी ब्राह्मण संघाचे अध्यक्ष बी. एस. कुलकर्णी यांनी संस्था स्थापन का करण्यात आली व त्या मागील उद्देश सांगितला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संध्या कुलकर्णी यांनी केले तर अभार डॉ. कुलकर्णी यांनी मानले.

सत्कार मूर्ती विद्यार्थ्यांमध्ये दहावी उत्तीर्ण मीरा बर्वे, रोहित गांगल, प्रथमेश दातार, प्रद्योत म्हैसकर, बादल राज विनोद तसेच बारावी उत्तीर्ण केदार जोशी, मल्हार बापट, चिन्मय मंगेश दिक्षित यासोबत विशेष पुरस्कार आपल्या कुटूंबतील कर्तुत्ववान महिला. सुचेता धनंजय जोशी यांना अहील्या होळकर पुरस्कार मिळाल्याबद्दल सत्कार करण्यात आला.



# वाशी सार्वजनिक रुग्णालयात रक्तदान दिन



**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबई महापालिका सार्वजनिक रूग्णालय, वाशी येथील महापालिका रक्तकेंद्राच्या वतीने वैद्यकिय अधिक्षक डॉ. प्रशात जवादे यांच्या मार्गदर्शनाखाली जागतिक रक्तदान दिन अत्यंत उत्साहात साजरा करण्यात आला.

यानिमित्त ऐच्छिक रक्तदान या विषयावर रांगोळी स्पर्धा, पोस्टर स्पर्धा, निबंध स्पर्धा अशा विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. १४ जून या जागतिक रक्तदान दिनी रक्तदान करण्याची प्रतिज्ञा घेण्यात येणार असून २५ पेक्षा जास्त वेळा रक्तदान केलेल्या रक्तदात्यांचे विशेष सत्कार करण्यात येणार आहेत. त्याचप्रमाणे रक्तदान शिबीर आयोजकांनाही सन्मानचिन्हे प्रदान करून गौरविण्यात येणार आहे. याशिवाय संपूर्ण जून महिन्यात प्रभातफेरी, व्याख्याने व व्हिडीओव्दारे जनजागृती करण्यात येणार आहे.

# 'केबीपी'चा केरळमधील लंडन कॉलेजशी सामंजस्य करार



**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेच्या कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेजने कोची (केरळ) येथील लंडन कॉलेजशी सामंजस्य करार केला आहे. हा सामंजस्य करार तीन वर्षाचा असून, या कराराअंतर्गत 'लॉजिस्टिक्स ॲन्ड सप्लाय चेन मॅनेजमेंट' हा तीन वर्षाचा अभ्यासक्रम पदवी स्तरावर शिकवला जाणार आहे. या अभ्यासक्रमाला कला, विज्ञान व वाणिज्य या शाखेतून बारावी उत्तीर्ण झालेले विद्यार्थी प्रवेश घेऊ शकतात.

हा अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर विद्यार्थ्यांना जेएनपीटी बंदर, विमानतळ, वेअर हाऊस केंद्रे तसेच विविध ठिकाणच्या बंदरावर नोकरीची संधी प्राप्त होणार आहे. व्यवसायाभिमुख अभ्यासक्रमाची गरज लक्षात घेऊन, नवी मुंबई परिसरात पहिल्यांदाच केबीपी कॉलेजमध्ये पदवी स्तरावर हा अभ्यासक्रम सुरू केला आहे. याचा लाभ नवी मुंबई परिसरातील विद्यार्थ्यांनी घ्यावा असे आवाहन महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. शुभदा नायक यांनी केले.

या करारावेळी लॉजिस्टिकचे संचालक डॉ. विमलचंद्रन, प्राचार्या डॉ. शुभदा नायक, कुमार अय्यर, गिरीश नायर, सना शेख, उपप्राचार्य प्रा. सी. डी. भोसले व प्रा. पांडूरंग आखाडे उपस्थित होते.

# माणगावला पुराचा धोका टळला

## जागृत नागरिकांमुळे दगडाचे ढिगारे हटवण्याचे काम सुरू

**माणगाव : प्रतिनिधी**

माणगाव काळ नदीवर असणारा ब्रिटीश कालीन पूल हा वाहतुकीसाठी अपुरा पडत असल्याने या पुलालगत दुसरा नवीन पूल शासनाकडून बांधण्याचे काम काही दिवसापासून सुरू झाले आहे. त्या पुलाच्या विस्तारीकरणासाठी संबंधित ठेकेदाराने काळ नदीत पिलर उभे करण्यासाठी मोठे खड्डे मारले होते. त्या खड्ड्यातील कातळ मोठ्या प्रमाणात निघाला असून त्या दगड व डबराचे ढिगारे संबंधित ठेकेदाराने नदीतच ठेवल्यामुळे या पावसाळ्यात पुराच्या पाण्याला अडथळा निर्माण होऊन काळ नदीचे पाणी माणगावात शिरून धोका निर्माण होणार असल्याबाबत जागृत नागरिक विजयशेठ मेहता यांनी संबंधित अधिकाऱ्यांच्या निदर्शनास आणून दिली. याबाबत दखल घेऊन काळ नदीतील दगडाचे ढिगारे हटवण्याचे काम युद्धपातळीवर सुरू केले आहे.



संबंधित ठेकेदाराने गेल्या पाच महिन्यांपासून माणगाव येथील काळनदी व कळमजे फाटा येथील गोद नदीमध्ये पिलर उभे करण्यासाठी मोठे खड्डे मारले होते. त्या खड्ड्याच्या उत्खननातील निघालेली मोठ्या प्रमाणात माती, दगड हे या नदीतच ठेवले होते. त्यामुळे या पावसाळ्यात शेकडो किमीवरून येणाऱ्या नदीच्या पाण्याचा प्रवाह बंद झाला होता. त्यामुळे पुराच्या पाण्याला अडथळा निर्माण होऊन हे पाणी माणगाव व परिसरातील भागातील गावात घुसण्याचा धोका होता. मेहता यांनी ही बाब विविध खात्याचे मंत्री, खासदार, आमदार तसेच महामार्गाचे अधिकारी यांच्या निदर्शनास आणून दिली. माणगाव काळ नदीवरील पूल हा ब्रिटीशकालीन शेकडो वर्षांपासून बांधलेला असून त्या पुलावर अनेक वेळा छोट्या मोठ्या दुरुत्या झाल्या आहेत, मात्र हा पूल वाहतुकीसाठी अपुरा पडत असल्याने या पुलावर वाहतूक कोंडी सतत होते. त्यामुळे प्रवासी, नागरक, व ग्रामस्थांच्या मागणीचा विचार करून या पुलालगत नवीन दुसरा पूल बांधण्याचे काम सुरू आहे. त्या खड्ड्यातील कातळ मोठ्या प्रमाणात निघाला असून त्या दगड व डबराचे ढिगारे संबंधित ठेकेदाराने नदीतच ठेवल्यामुळे या पावसाळ्यात पुराच्या पाण्याला अडथळा निर्माण होऊन काळ नदीचे पाणी माणगावात शिरून धोका निर्माण होणार असल्याचे मेहता यांनी सांगितले.

# मुरूडमध्ये गावठी दारू बनविण्याचे रसायन केले नष्ट

### पोलिसांची कारवाई

**मुरूड : प्रतिनिधी**

मुरूडचे पोलीस निरीक्षक प्रकाश सकपाळ यांच्या मार्गदर्शनाखाली गस्त घालीत असताना गोपाळवट येथील जंगल परिसरात अवैधरित्या गावठी दारुची हातभट्टी लावण्याचे रसायन आढळल्याने पोलिसांनी दारू बनविण्याचे कच्चे रसायन नष्ट केले.



या कारवाई मोहिमेत पोलीस उपनिरीक्षक नितीन मंडलिक, नाईक सुरेश वाघमारे, शिपाई विक्रांत बांधणकर, सागर रसाळ, किरण कांबळे, मकरंद पाटील, अमित डफळ आदिंसह पोलिस उपस्थित होते. या कारवाईत हातभट्टीवर दारू तयार करण्याचे साहित्य, २०० लिटरचे प्लास्टिक सात ड्रम, त्यामध्ये गूळ, नवसागर मिश्रीत एकूण १४०० लिटर रसायन असा अंदाजे ७०००० हजार रुपये किंमतीचा रसायन व भट्टीचे साहित्य नष्ट केले आहे.

# कर्जत पुलाची वाडीत पाणीटंचाई

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत शहरालगत असलेल्या किरवली ग्रामपंचायतीमधील पुलाची वाडीमध्ये तीव्र पाणीटंचाई निर्माण झाली आहे. त्यामुळे ग्रामस्थांना पिण्याच्या पाण्यासाठी दूरवर जावे लागत आहे.

किरवली हद्दीतील पुलाचीवाडी येथील बोअरवेलची जमीन मुंबई-पुणे रेल्वेमार्गाच्या विस्तारीत कामासाठी संपादीत झाल्याने पुलाचीवाडी, ज्ञानदीप सोसायटी व बोरवाडी येथील ग्रामस्थांना पिण्याच्या पाण्याची तीव्र टंचाई जाणवत आहे. त्यामुळे रेल्वे प्रशासनाने येथील लोकांसाठी पिण्याची पाण्याची पर्यायी व्यवस्था करण्यात यावी, अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. या परिसरासाठी रेल्वेच्या पूर्व बाजूस मुंबई-पुणे रेल्वेचे असलेले शासकीय बोअरवेल काम चालू असताना ते काम रेल्वेकडून बंद करण्यात आले. त्यामुळे स्थानिकांची पाण्याची सोय होण्यात अडचणी निर्माण झाल्या आहेत.

याबाबत किरवली ग्रामपंचायतीचे सरपंच आणि ग्रामविकास अधिकाऱ्यांना शिवसेना शाखाप्रमुख भगवान पोळेकर यांनी निवेदनाद्वारे पाण्याचा प्रश्न सोडवावा, अशी मागणी केली आहे.

# प्रत्येक विभागाने उद्दिष्टे वेळेत पूर्ण करावे –जिल्हाधिकारी

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

शासन जनतेच्या कल्याणासाठी अनेक नावीन्यपूर्ण योजना राबवित आहे. या योजना जनतेपर्यंत पोहचाव्यात, यासाठी शासनाने शासन आपल्या दारी हा उपक्रम सुरू केला आहे. या उपक्रमांतर्गत विविध शासकीय विभागांना आपल्या योजना जनेतपर्यंत थेट पोहचविण्यासाठी दिलेली उद्दिष्टे विहित वेळेत पूर्ण करावीत, असे निर्देश जिल्हाधिकारी डॉ. योगेश म्हसे यांनी विविध शासकीय विभागांच्या अधिकाऱ्यांना दिले.




जिल्हाधिकारी कार्यालयातील राजस्व सभागृहात आयोजित शासन आपल्या दारी या उपक्रमाच्या आढावा बैठकीत ते बोलत होते. या वेळी निवासी उपजिल्हाधकारी संदेश शिर्के, उपजिल्हाधिकारी सर्जेराव म्हस्के-पाटील, उपजिल्हाधिकारी (निवडणूक) स्नेहा उबाळे, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. सुहास माने, सहायक आयुक्त, समाज कल्याण सुनिल जाधव, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी उज्वला बाणखेले, प्रकल्प अधिकारी आदिवासी विकास विभाग, पेण शशिकला अहिरराव, तहसिलदार सचिन शेजाळ, सहायक पुरवठा अधिकारी गोविंद वाकडे आदी उपस्थित होते.

या वेळी जिल्हाधिकारी डॉ. म्हसे म्हणाले की, मुख्यमंत्री महोदयांच्या उपस्थित शासन आपल्या दारी हा जिल्ह्यात नियोजित कार्यक्रम आहे. उद्दिष्टे पूर्ण करण्यासाठी जिल्हा उद्योग केंद्र, जिल्हा कौशल्य विभाग, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी यांनी रोजगार मेळाव्याचे नियोजन करावे. आरोग्य विभागानेही महाआरोग्य शिबिराचे आयोजन करावे.

जिल्हाधिकाऱ्यांनी जिल्हा परिषद, समाज कल्याण, महिला व बालकल्याण विभाग, जिल्हा उद्योग केंद्र, महावितरण विभाग, महानगपालिका, नगरपालिका, उप प्रादेशिक परिवहन विभाग पेण व पनवेल, दुय्यम निबंधक, महसूल विभाग तसेच इतर शासकीय विभागांना दिलेल्या उद्दिष्टयपूर्तीचा या बैठकीत सविस्तर आढावा घेतला.

# श्रीवर्धनमध्ये 'महावितरण'ची मनमानी सुरूच

### वीजपुरवठा खंडित

**श्रीवर्धन : बातमीदार**

श्रीवर्धन तालुक्यात महावितरणची मनमानी सुरूच असल्याचे पहायला मिळत आहे. अरबी समुद्रात तयार झालेले बिपरजॉय चक्रीवादळ गुजरात व पाकिस्तानच्या दिशेने सरकत असताना, श्रीवर्धन तालुक्यात सोसाट्याचे वारे सुटत होते. अधून मधून पावसाच्या सरीदेखील बरसत होत्या. त्यावेळी विजेचा खेळखंडोबा सुरूच होता. दर पाच मिनिटांनी वीजपुरवठा खंडित होत होता.



पाभरे येथून श्रीवर्धनकडे येणाऱ्या मुख्य वीजवाहिनीमध्ये बिघाड झाल्यामुळे गुरुवारी (दि. ८)दुपारी दीड वाजता खंडित झालेला वीजपुरवठा सुरू होण्यासाठी महावितरणला रात्रीचे साडेआठ वाजले होते. त्यानंतर शुक्रवारी रात्रीदेखील जवळजवळ तीन ते चार तास वीज पुरवठा खंडित झाला होता. मंगळवारी (दि. १३) सकाळी नऊ ते सायंकाळी सहा वाजेपर्यंत वीजपुरवठा खंडित करण्यात आला होता. पाभरे येथील वीज उपकेंद्रात दुरुस्ती व देखभालीच्या कामासाठी वीजपुरवठा खंडित करण्यात आल्याचे सांगण्यात आले.

कोणत्याही ग्राहकाने एक दिवस वीज बिल भरण्यासाठी उशीर केला तर त्याची विजजोडणी कापण्यात येते, मात्र अमाप बिले भरूनसुद्धा महावितरणकडून ग्राहकांना सुमार दर्जाची सेवा पुरविली जात आहे. महावितरणने आपल्या कारभारात सुधारणा करावी, अशी मागणी करण्यात येत आहे.

## विजेचा शॉक लागून गायीचा मृत्यू

**मुरूड : प्रतिनिधी**

मुरूड शहरात मंगळवारी (दि. १३) पहाटेपासूनच पावसाला जोरदार सुरुवात झाली. शहरातील मारुती नाका परिसरात एका गायीचा विजेच्या पोलला स्पर्श झाल्याने तिचा मृत्यू झाला.

पावसाळ्यापूर्वी विजेचे पोल तपासून पोलमधून वीजप्रवाह जात असेल, तर त्याचवेळी उपाययोजना करणे खूप आवश्यक असताना याकडे महावितरणने दुर्लक्ष केल्यामुळे आज ही दुर्दैवी घटना घडल्याचा आरोप नागरिकांमधून होत आहे. याबाबत मुरूड महावितरणने सांगितले की, अशी घटना पुढे घडू नये यासाठी शहरातील सर्व पोलची तपासणी करून सर्व व्यवस्था चोख बजावण्यात येईल.

## सद्भाव फाउंडेशनतर्फे टँकरद्वारे पाणीपुरवठा

**कर्जत : प्रतिनिधी**

सद्भाव फाउंडेशन यांच्यामार्फत तालुक्यात टँकरने मोफत पाणीपुरवठा करण्यात आले.

तालुक्यातील चाफेवाडी, वडाचीवाडी, ताडवाडी, जांभूळवाडी, चौधरवाडी, पिंपळपाडा, बीड वाड्यावर ८ मेपासून टँकरने मोफत पिण्याच्या पाणीपुरवठा केला जात आहे. सद्भावचे प्रवीण पाटील, प्रगती पाटील, ट्रस्टी निता दोषी, मधुकर भाई, बशी भाई, संस्थेचे कार्यकर्ते संतोष ढाकवळ, चेतन, ग्रामपंचायत सदस्य तुकाराम हिंदोळा, भाऊ भगत, संतोष भोईर यांचे विशेष सहकार्य लाभले आहे.




# पावसाळ्यातही नांदगाव किनारी वाळू काढणाऱ्यांची रेलचेल

**मुरूड : प्रतिनिधी**

सध्या तालुक्यात पावसाची जोरदार सुरुवात तसेच लाटांचे तांडव सुरू असतानादेखील नांदगाव समुद्रकिनारी वाळू काढण्यासाठी रेलचेल सुरू आहे.

पावसाळ्यात समुद्रकिनारी मोठ्या लाटा येत असताना केवळ पैसे कमविण्यासाठी काही लोक बैलगाडीचा उपयोग करून मुक्या प्राण्यांचीही चिंता न करता बांधकामासाठी लागणारी वाळू काढत आहेत. अगोदरच नांदगाव समुद्रकिनारी वाळू उपसली जात असल्याने लोकांच्या बगायती जमिनीमधील नारळ, सुपारीची झाडे उन्मळून पडली आहेत. येथील स्थानिकांनी महसूल विभाग यांना तक्रारी करूनही अधिकारी दुर्लक्ष करीत असल्याने वाळू काढणाऱ्यांचे चांगलेच फावले आहे.

याबाबत सदस्य सचिन गणपत पाटील यांनी सांगितले की, रेती मिळवण्यासाठी मुक्या प्राण्यांवर अत्याचार केला जात आहे. वेळोवेळी महसूल विभागाला सांगूनही वाळू उत्खनन थांबत नाही. महसूल विभगाने लक्ष देणे खूप आवश्यक आहे.



# जंगलवाढीसाठी बियांची रुजवण; सहकुटुंब पुढाकार

**पाली : प्रतिनिधी**

पावसाळा तोंडावर आला आहे आणि या पावसाळ्यात ओस पडलेली जंगले व माळरानावर वृक्षराजी बहरण्यासाठी सध्या अनेकजण एक अनोखा उपक्रम राबवित आहेत. उन्हाळ्यात खाल्ले आंबे व जांभळे यांचे बाटे व बिया मोठ्या प्रमाणात साठवून त्या जंगल व माळरानावर टाकून जंगल जोपासली जाणार आहेत. समाजमाध्यमांवर यासंदर्भातील व्हिडीओ व फोटो टाकून इतरांनादेखील या उपक्रमात सहभागी होण्याचे आवाहन करत आहेत.

जांभळाच्या बिया व आंब्याचे बाटे यांची झाडांपासून दूरवर निसर्गतः कुठे रुजवून होत नाही. त्यामुळे कृत्रिमरीत्या जंगल व माळरान जमिनीवर आंब्याचे बाटे व जांभळाच्या बिया टाकल्यास पहिला पाऊस पडल्यावर त्यांना अंकुर फुटते व नैसर्गिकरित्या त्यांचे रोपात रूपांतर होते. शिवाय कोणतीही अतिरिक्त देखभाल व मशागत न करता पावसाचे पाणी व जमिनीतील पोषकद्रव्ये घेऊन ही रोपे चांगली वाढतात. जांभळाच्या साध्या बिया व साधे बाटे जंगलात आजूबाजूला फेकल्यास त्यांची रुजवण चांगली होते. यांच्यापासून तयार झालेली रोपांना पाणी कमी लागते आणि त्यांची वाढ चांगली होते. विरळ जंगलात व ओसाड माळरानावर बिया व बाटे टाकल्यास त्यांची रुजवण होऊन झाडे तयार होतील व आपोआप जंगले व माळरानावर वृक्षराजी बहरतील. यामुळे येथे वेगवेगळे पक्षी प्राणी सुद्धा येतील त्यामुळे येथील निसर्गसंपदा आणखी समृद्ध होईल. शिवाय झाडांची मुळे पाणी धरून ठेवतील आणि आपोआपच जमिनीतील पाण्याची पातळीदेखील वाढेल. एकूण या उपक्रमामागील हा उद्देश आहे.



**निसर्ग राखण्यासाठी सहकुटुंब एक छोटा प्रयत्न केला आहे. आंब्याचे बाठे जंगलात टाकले आहेत. याची झाडे तयार झाल्यास पशुपक्षी व माणसांना गोड फळे, सावली व निवारा देतील. तसेच जंगले देखील समृद्ध होतील. याशिवाय ही रोपे जपण्याचा प्रयत्न करण्याचा संकल्प देखील केला आहे.**

***–निहारिका शिर्के***, *निसर्गप्रेमी*

**अनेक हात सरसावले**

***पालीतील पर्यावरणप्रेमी अमित निंबाळकर यांनी सांगितले की, यंदा मोठ्या प्रमाणावर जांभळाच्या बिया व आंब्याचे बाठे गोळा करून ठेवले आणि मित्र मिळून आजूबाजूच्या ओसाड जंगलामध्ये फेकले. त्याचबरोबर हा सर्व व्हिडीओ तयार केला व या उपक्रमाची सविस्तर माहिती त्यामध्ये दिली. हा व्हिडीओ पाहून अनेक जण हा उपक्रम करण्यासाठी पुढे सरसावले आहेत.***

# नागोठण्यात विविध पुरस्कारांचे वितरण

**नागोठणे : बातमीदार**

मॅक्स महाराष्ट्र चॅनेल व परिवर्तनवादी पत्रकार संघ यांच्या संयुक्त विद्यमाने नागोठण्यातील टीएसके सभागृहात रविवारी (दि.११) विविध पुरस्कार वितरण सोहळा आयोजित करण्यात आला होता.

या सोहळयाला संभाजीराजे छत्रपती, खासदार सुनील तटकरे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नातू आणि रिपब्लिकन सेनेचे सरसेनानी आनंदराज आंबेडकर, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे पणतू भारतीय बौद्ध सभेचे राष्ट्रीय अध्यक्ष राजरत्न आंबेडकर, आमदार आदिती तटकरे, राजिप सदस्य किशोर जैन, जैन, आरपीआयचे कोकण नेते व्ही. के. जाधव, ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते भाईसाहेब टके आदी उपस्थित होते.

या कार्यक्रमात पत्रकारिता क्षेत्रातील विलास आठवले, डॉ. सुनील गायकवाड, अभिषेक पांडे, हर्षद कशाळकर, दत्तकुमार खंडागळे, सचिन कदम, अशोक कांबळे, अमित गवळे, भगवान पगारे, संतोष पेरणे, पंढरीनाथ बोकरे, प्रियदर्शनी हिंगे, किरण सोनावणे, समीर मालोदे (छायाचित्रकार), कल्पेश ठाकूर (देवदूत) व भाग्यश्री पाटील (निवेदिका) यांचा मान्यवरांच्या हस्ते पुरस्कार देऊन सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मॅक्स महाराष्ट्र चॅनेलचे संपादक रवींद्र आंबेकर व परिवर्तनवादी पत्रकार संघाचे अध्यक्ष धम्मशील सावंत यांनी तर सूत्रसंचालन मॅक्स महाराष्ट्रच्या निवेदिका भाग्यश्री पाटील व सुजाता पवार यांनी केले.

# रोहितचे कसोटी कर्णधारपद धोक्यात

## विंडीज दौऱ्यानंतर भारतीय संघाला नवे नेतृत्व मिळण्याची शक्यता



**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिपच्या फायनलमध्ये पराभूत झाल्यानंतर टीम इंडियाचा कर्णधार रोहित शर्मावर सातत्याने टीका केली जात आहे. रोहितच्या कसोटी कर्णधारपदाला तत्काळ धोका नसला तरी पारंपरिक कसोटी फॉरमॅटमधील कर्णधारपदावर टांगती तलवार आहे. वेस्ट इंडिज दौऱ्यात तो कशी कामगिरी करतो हे त्याच्या कारकिर्दीसाठी खूप महत्त्वाची ठरणार आहे.

रोहित वेस्ट इंडिजमधील दोन कसोटी सामन्यांच्या मालिकेत भारतीय संघाचे नेतृत्व करेल आणि त्यानंतर भारतीय क्रिकेट नियामक मंडळासोबत (बीसीसीआय) बसून कसोटी स्वरूपातील त्याच्या भविष्याबाबत चर्चा होईल. जर भारतीय संघातील सदस्यांना या प्रकरणाची माहिती असेल, तर १२ जुलैपासून डोमिनिका येथे होणाऱ्या वेस्ट इंडिजविरुद्धच्या दोन कसोटी सामन्यांच्या मालिकेत कर्णधारपद सोडण्याचा निर्णय न घेतल्यास रोहित संघाचे नेतृत्व करेल, मात्र डॉमिनिका किंवा पोर्ट ऑफ स्पेन येथे होणाऱ्या दुसऱ्या कसोटीत (२० ते २४ जुलै) रोहितने कोणतीही मोठी खेळी न केल्यास बीसीसीआयचे सर्वोच्च अधिकारी आणि राष्ट्रीय निवड समितीवर कठोर निर्णय घेण्याचा दबाव असेल.

रोहितने २०२२मध्ये कसोटी कर्णधारपदाची सूत्रे हाती घेतल्यापासून भारताने १० कसोटी सामने खेळले. त्यापैकी तीन कसोटीत तो खेळला नाही. यादरम्यान त्याने सात कसोटीत ३९० धावा केल्या आणि त्याची सरासरी ३०.०७ होती. यादरम्यान त्याने शतक झळकावले, पण याशिवाय दुसरी धावसंख्या ५० धावांच्या वर नव्हती.

बीसीसीआयच्या एका वरिष्ठ सूत्राने पीटीआयला सांगितले की, रोहित पूर्ण दोन वर्षांचा वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिपच्या सायकलमध्ये कर्णधार म्हणून असेल का हा एक मोठा प्रश्न आहे, कारण २०२५मध्ये तिसरी आवृत्ती संपेल तेव्हा तो ३८ वर्षांचा असेल.

### कोचिंग स्टाफमध्येही बदलाचे संकेत

वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिप अंतिम सामन्यातील पराभवानंतर भारतीय संघाच्या खेळाडूंसोबतच संघाच्या सपोर्ट स्टाफलाही टीकेला सामोरे जावे लागत आहे. त्याचवेळी भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने (बीसीसीआय) आता डब्ल्यूटीसी फायनलमधील पराभवानंतर संघाच्या सपोर्ट स्टाफला इशारा केला आहे.

बीसीसीआयच्या सूत्राने एका स्पोर्ट्स वेबसाईटशी बोलताना सांगितले की, गोलंदाजी आणि फलंदाजी प्रशिक्षकावर बोर्ड कारवाई करू शकते. डब्ल्यूटीसी फायनलमधील भारतीय संघाच्या कामगिरीनंतर 'इनसाइड स्पोर्ट्स'मध्ये प्रकाशित झालेल्या बीसीसीआयच्या एका अधिकाऱ्याच्या विधानानुसार एकदिवसीय विश्वचषक २०२३ला लक्षात घेऊन या पराभवानंतर फलंदाजी प्रशिक्षक विक्रम राठोड आणि गोलंदाजी प्रशिक्षक पारस म्हांबरे यांचे स्थान काय असेल हे ठरवले जाणार आहे. मुख्य प्रशिक्षक राहुल द्रविड २०२३च्या एकदिवसीय विश्वचषकापर्यंत ही जबाबदारी पार पाडताना दिसणार आहे. एकदिवसीय विश्वचषकातील कामगिरीच्या आधारे द्रविडच्या प्रशिक्षकपदाबाबत अधिक चर्चा केली जाईल. त्यानंतरच त्याला मुदतवाढ देण्याचा निर्णय होईल, असे मानले जात आहे.

### इंडोनेशिया खुली बॅडमिंटन स्पर्धा
## सिंधू, प्रणॉय उपउपांत्यपूर्व फेरीत

**जकार्ता : वृत्तसंस्था**



भारताचे आघाडीचे खेळाडू पी. व्ही. सिंधू आणि एच. एस. प्रणॉय यांनी इंडोनेशिया खुल्या बॅडमिंटन स्पर्धेत मंगळवारी पहिल्या फेरीचा अडथळा पार करताना उपउपांत्यपूर्व फेरीत प्रवेश केला. सिंधूला गेल्या दोन स्पर्धेत पहिल्या फेरीत आव्हान गमवावे लागले होते. प्रणॉयही मलेशियातील विजेतेपदानंतर लय गमावून बसला होता.

इंडोनेशिया खुल्या या सुपर १००० दर्जाच्या मानांकन स्पर्धेत सिंधूने सलामीला ३८ मिनिटांत यजमान देशाच्या ग्रेगोरिया मरिस्का तुनजुंगचा २१-१९, २१-१५ असा पराभव केला. सिंधूचा ग्रेगोरियाविरुद्धचा पहिलाच विजय ठरला. यापूर्वी माद्रिद स्पर्धेच्या अंतिम आणि मलेशिया स्पर्धेच्या उपांत्य फेरीत सिंधूला ग्रेगोरियाकडून पराभवाचा सामना करावा लागला होता.

पहिल्या गेममध्ये सिंधूला ग्रेगोरियाकडून चांगले आव्हान मिळाले, मात्र सिंधूने आपल्या उंचीचा पुरेपूर वापर करून घेत ओव्हरहेड फटक्यांनी ग्रेगोरियावर वर्चस्व राखले. सिंधूने गेमच्या मध्याला ११-१० अशी आघाडी मिळवली. त्यानंतर सिंधूने सातत्याने ग्रेगोरियाला चुका करण्यास भाग पाडले आणि पहिला गेम जिंकला.

दुसऱ्या गेममध्ये मात्र सिंधूने एकतर्फी वर्चस्व राखले. सिंधूची गाठ आता तिसऱ्या मानांकित ताय त्झू यिंगशी पडणार आहे. आता हाँगकाँगच्या एन्जी लॉन्ग अँगसचे आव्हान असेल.

# धोनी आयपीएलला करणार अलविदा?

## 'सीएसके'कडून व्हिडीओ शेअर

**चेन्नई : वृत्तसंस्था**

आयपीएलच्या १६व्या हंगामात धोनीच्या नेतृत्वाखाली चेन्नई सुपर किंग्जने गुजरात टायटन्सविरुद्धच्या सामन्यात शेवटच्या चेंडूवर विजेतेपद



पटकावले. दरम्यान, सीएसकेने कर्णधार महेंद्रसिंह धोनीसंदर्भात एक व्हिडीओ शेअर केला आहे.

इंडियन प्रीमियर लीग मधील अंतिम सामना चेन्नई सुपर किंग्सने जिंकला तेव्हा सर्व क्रिकेट चाहत्यांच्या चेहऱ्यावर आनंद नक्कीच दिसत होता. गुजरातविरुद्धच्या अंतिम सामन्यात चेन्नईने डावाच्या शेवटच्या चेंडूवर पाच गडी राखून सामना अतिशय रोमांचकारी पद्धतीने जिंकला. धोनीच्या नेतृत्वाखाली चेन्नईने पाचव्यांदा आयपीएल ट्रॉफी जिंकली आहे. त्याचबरोबर धोनी पुढच्या सीझनमध्ये खेळणार की नाही, असा प्रश्नही सर्वांच्या मनात घोळत आहे.

चेन्नई सुपर किंग्सने सोशल मीडियावर ३३ सेकंदांचा एक व्हिडीओ शेअर केला, ज्यामध्ये धोनी खेळतानाच्या अनेक चित्रांसह ड्रेसिंग रूमच्या दिशेने चालताना दिसत आहे. व्हिडिओच्या कॅप्शनमध्ये सीएसकेने लिहिले, 'ओह कॅप्टन, माय कॅप्टन'. हा व्हिडीओ समोर आल्यानंतर चाहत्यांमध्ये धोनी निवृत्ती घेणार की काय अशी चर्चाही जोर धरू लागली आहे.

तीन वर्षांपूर्वी धोनीने आंतरराष्ट्रीय क्रिकेटला ज्या प्रकारे अलविदा केला त्याची कल्पनाही कोणी केली नसेल. त्याचवेळी असे काहीतरी आयपीएलला अलविदा म्हणण्याची अपेक्षा केली जात आहे, मात्र अंतिम सामन्यानंतर धोनीने आपल्या वक्तव्यात या सर्व अटकळांना पूर्णविराम देण्याचा प्रयत्न केला. त्याने सांगितले की, पुढच्या हंगामात खेळण्याचा निर्णय घेण्यासाठी त्याला अजून सात ते आठ महिने आहेत.

या व्हिडीओमुळे चाहत्यांची चिंता वाढली आहे. धोनी लवकरच निवृत्तीची घोषणा करणार असल्याचे त्यांना वाटत आहे. या व्हिडीओला उत्तर देणाऱ्या चाहत्यांनी सीएसकेला विचारले की हा व्हिडीओ माहीच्या निवृत्तीचा इशारा आहे का? काही चाहत्यांनी व्हिडीओवरून असाही अंदाज लावला की, कदाचित धोनी कर्णधारपद सोडणार आहे.

गुडघ्याचा त्रास असतानाही महेंद्रसिंग धोनी आयपीएलच्या १६व्या हंगामातील सर्व सामने खेळला. मात्र, त्यामुळे त्याला फलंदाजी क्रमाने प्रथम खेळायला मिळाले नाही. त्याचवेळी सीझन संपल्यानंतर धोनीच्या गुडघ्यावर पहिल्यांदा शस्त्रक्रिया करण्यात आली, जी यशस्वी झाली आहे.

## आगामी 'डब्ल्यूटीसी' वेळापत्रक जाहीर

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

जागतिक कसोटी अजिंक्यपद २०२१-२३ स्पर्धेचे जेतेपद पटकावल्यानंतर ऑस्ट्रेलियन संघ आगामी स्पर्धेच्या तयारीला लागला आहे. शुक्रवारपासून ऑस्ट्रेलिया-इंग्लंड या दोन कट्टर प्रतिस्पर्धींच्या अ‍ॅशेस मालिकेतून डब्ल्यूटीसी २०२३-२०२५ला सुरुवात होत आहे.

जागतिक कसोटी अजिंक्यपद स्पर्धेत भारतीय संघाने दोन वेळा अंतिम फेरीत प्रवेश मिळवला, परंतु दोन्ही वेळेस उपविजेतेपदावर समाधान मानावे लागले. न्यूझीलंड आणि ऑस्ट्रेलिया यांनी मानाची गदा पटकावली. डब्ल्यूटीसीच्या तिसऱ्या पर्वात एकूण २७ मालिकांमध्ये ६८ सामने आहेत.

# मेस्सीपाठोपाठ एम्बापेही पॅरिस सेंट-जर्मेन क्लब सोडणार

**मँचेस्टर : वृत्तसंस्था**

तारांकित आघाडीपटू आणि फुटबॉलचे भविष्य म्हणून पाहिले जाणारा किलियन एम्बापे फ्रेंच फुटबॉल क्लब पॅरिस सेंट-जर्मेनला निरोप देण्याच्या तयारीत आहे. एम्बापेचा सेंट-जर्मेनसोबतचा करार आगामी हंगामाअंती संपुष्टात येणार आहे. त्यानंतर हा करार आणखी एका वर्षांने वाढवण्याची एम्बापेकडे मुभा आहे, मात्र आपण तसे करणार नसल्याचे एम्बापेने सेंट-जर्मेनला कळवले आहे. त्यामुळे आता लिओनेल मेस्सीपाठोपाठ एम्बापेही सेंट-जर्मेन क्लब सोडण्याची शक्यता बळावली आहे.



२४ वर्षीय एम्बापेने सेंट-जर्मेनच्या व्यवस्थापनाला सोमवारी पत्र पाठवून आपला निर्णय कळवला. आगामी हंगामाअंती करार संपुष्टात आल्यानंतर एम्बापे आपल्या पसंतीच्या संघाशी करारबद्ध होऊ शकेल. तसे झाल्यास सेंट-जर्मेनला काहीच मोबदला मिळणार नाही. त्यामुळे सेंट-जर्मेनने आता एम्बापेची विक्री करण्याचा विचार सुरू केला आहे.

गेल्या काही काळापासून स्पेनमधील बलाढ्य क्लब रेयाल माद्रिद एम्बापेला खरेदी करण्याचा प्रयत्न करीत आहे. त्यातच करीम बेन्झिमाने काही दिवसांपूर्वीच रेयाल माद्रिद सोडून सौदी अरेबियातील क्लबकडून खेळण्याचा निर्णय घेतला. त्यामुळे त्याची जागा घेण्यासाठी रेयालकडून विविध नामांकित आघाडीपटूंचा विचार केला जात आहे. यात एम्बापेचे नाव आघाडीवर आहे. रेयालने २०२१मध्ये एम्बापेला आपल्या संघात दाखल करून घेण्यासाठी सेंट-जर्मेनला १९० मिलियन डॉलर देण्याची तयारी दर्शवली होती, मात्र सेंट-जर्मेनने एम्बापेला आपल्याकडेच राखण्याचा निर्णय घेतला तसेच त्याच्याशी नव्याने करारही केला, परंतु आता एम्बापेनेच सेंट-जर्मेन क्लब सोडण्याची तयारी दर्शवली आहे. एम्बापेकडे आपला करार एका वर्षांने वाढवण्यासाठी ३१ जुलैपर्यंतचा वेळ होता, मात्र त्याने करार वाढवणार नसल्याचे स्पष्ट केले आहे.

### मोठा धक्का!

*मेस्सीने सेंट-जर्मेनसोबतचा करार संपुष्टात आल्यानंतर अमेरिकेतील इंटर मियामी संघाकडून खेळण्याचा निर्णय घेतला. मेस्सी पुन्हा नव्याने करार करणार नाही हे अपेक्षितच होते, मात्र एम्बापेचा निर्णय हा सेंट-जर्मेनसाठी मोठा धक्का आहे. एम्बापेची सध्याच्या घडीला जगातील सर्वोत्तम खेळाडूंमध्ये गणना केली जाते तसेच तो फ्रान्सचा सर्वात नामांकित खेळाडू आहे. २०१७ सालापासून सेंट-जर्मेनचे प्रतिनिधित्व करताना एम्बापेने सर्व स्पर्धांत मिळून २६० सामन्यांत २१२ गोल केले आहेत.*

# एका चेंडूवर दिल्या १८ धावा

## तामिळनाडूमध्ये गोलंदाजाचा लाजिरवाणा विक्रम

**चेन्नई : वृत्तसंस्था**

आयपीएल २०२३चा हंगाम संपला आणि त्यानंतर भारतीय संघाची वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिपची फायनलदेखील झाली. आता टीम इंडिया वेस्ट इंडिज दौऱ्यावर जाणार आहे. यासाठी अद्याप थोडा कालावधी शिल्लक आहे. अशात देशात तामिळनाडू प्रीमियर लीग २०२३ला सुरुवात झाली आहे. या स्पर्धेत अशा एका विक्रमाची नोंद झाली आहे.

लीगमधील सालेम स्पार्टन्सचा कर्णधार अभिषेक तंवर याच्या नावावर असा एक विक्रम झालाय जो तो कधीच लक्षात ठेवण्याचा प्रयत्न करणार नाही. त्याने मॅचमधील अखेरच्या ओव्हरमधील अखेरच्या चेंडूवर १८ धावा दिल्या. क्रिकेटच्या इतिहासात एका चेंडूवर इतक्या धावा देण्याची ही पहिलीच वेळ आहे.

टी-२० क्रिकेटमध्ये एका ओव्हरमध्ये ३६ धावा झालेल्या पाहिल्या आहेत. ओव्हरच्या सर्व चेंडूवर षटकार पाहिलेल्या क्रिकेट चाहत्यांना तामिळनाडू प्रीमियर लीगमध्ये असे काही तरी पहायला मिळाले जे कधीच घटले नाही. टीएनपीएल २०२३च्या दुसऱ्या मॅचमध्ये हा विक्रम झाला, जो अनेक वर्ष लक्षात ठेवला जाईल.

सालेम स्पार्टन्स आणि चेपॉक सुपर गिलिल यांच्यात झालेल्या सामन्यात स्पार्टन्सचा कर्णधार अभिषेक तंवरने २०व्या ओव्हरच्या अखेरच्या चेंडूवर १८ धावा दिल्या. क्रिकेटच्या इतिहासातील हा दुसऱ्या क्रमांकाचा सर्वांत महाग चेंडू, तर टी-२० क्रिकेटमधील अखेरच्या ओव्हरच्या सर्वांत महाग अखेरचा चेंडू ठरला आहे. क्रिकेटमधील सर्वांत महाग चेंडूचा विक्रम ऑस्ट्रेलियात होणाऱ्या बिग बॅश लीगमध्ये झाला आहे. या लीगमध्ये एका चेंडूवर २० धावांचा विक्रम आहे. २०१३-१४ मध्ये क्लिंट मॅके या गोलंदाजाने एका चेंडूवर २० धावा दिल्या होत्या.

अभिषेकने २०व्या ओव्हरची सुरुवात बरी केली होती, पण अखेरच्या ओव्हरने सर्व काही वाया गेले. सुरुवातीच्या पाच चेंडूवर आठ धावा दिल्या होत्या. पण सहाव्या चेंडूवर त्याने संजय यादवला चेंडू टाकला जो एक शानदार यॉर्कर होता. या चेंडूवर संजय क्लीन बोल्ड झाला खरा, पण त्यानंतर सर्व गोंधळ सुरू झाला. ज्या चेंडूवर अभिषेकने संजयला क्लीन बोल्ड केले तो नो बॉल होता. या चेंडूनंतर फलंदाजाने त्याच्याकडून बदलाच घेतला.

नो बॉलनंतर अभिषेकने फ्री हिटसाठी चेंडू टाकला, पण तो देखील नो बॉल झाला आणि या वेळी संजयने कोणतेही चूक केली नाही. फ्री हिटवर षटकार मारला. त्यानंतर अभिषेकने टाकलेला पुढचा चेंडूदेखील नो बॉल ठरला ज्यावर संजयने दोन धावा काढल्या. आता आणखी एक फ्री हिटचा चेंडू होता जो अभिषेकने वाइड टाकला. अखेर कसे बसे अभिषेकने सहावा चेंडू योग्य पद्धतीने टाकला ज्यावर संजयने षटकार मारला.

## न्यूझीलंडला धक्का, विल्यमसननंतर ब्रेसवेल वर्ल्डकपमधून बाहेर

**ऑकलंड : वृत्तसंस्था**

आता यंदाच्या वनडे विश्वचषकावर सर्वांच्या नजरा लागल्या आहेत. भारतात होणाऱ्या या विश्वचषकासाठी सर्वच संघ कमी अधिक प्रमाणात तयारीला लागले आहेत, पण तत्पूर्वी न्यूझीलंडच्या संघाला धक्का देणारी एक महत्त्वाची बातमी अमोर आली आहे. न्यूझीलंडचा अष्टपैलू खेळाडू मायकेल ब्रेसवेलला इंग्लंडमध्ये सुरू असलेल्या टी-२० ब्लास्टदरम्यान घोटचाला दुखापत झाली. आता तो सहा ते आठ महिने संघाबाहेर राहणार आहे.



विश्वचषकातील सर्वांत मोठा सामनाविजेता केन विल्यमसनलाही स्पर्धेतून बाहेर होण्याची शक्यता आहे. न्यूझीलंडचे मुख्य प्रशिक्षक गॅरी स्टेड म्हणाले, ही दुखापत गंभीर आहे. आता त्याला विश्वचषक संघातून वगळावे लागू शकते. ब्रेसवेलने २२ मार्च रोजी एकदिवसीय क्रिकेटमध्ये पदार्पण केले आणि सहाव्या आणि सातव्या क्रमांकावर फलंदाजी करताना १९ एकदिवसीय सामन्यांमध्ये ४२.५०च्या सरासरीने ५१० धावा केल्या आहेत. ब्रेसवेलवर यूकेमध्ये शस्त्रक्रिया होईल आणि त्यानंतर दीर्घ पुनर्वसन कालावधी असेल.

## ऋषभ पंतच्या प्रकृतीत सुधारणा



**बंगळुरू : वृत्तसंस्था**

भारतीय क्रिकेट संघाला जागतिक कसोटी चॅम्पियनशिपच्या अंतिम सामन्यात दारुण पराभवाला सामोरे जावे लागले. शेवटच्या दिवशी लक्ष्याचा पाठलाग करताना विराट कोहली, अजिंक्य रहाणे आणि रवींद्र जडेजा यांसारख्या दिग्गजांच्या विकेट पडत होत्या, तेव्हा चाहत्यांच्या मनातून एकच इच्छा बाहेर पडत होती. ती म्हणजे, ऋषभ पंत असायला हवा होता. पंतला मैदानावर पुन्हा पाहण्याची चाहत्यांची इच्छा लवकरच पूर्ण होणार आहे. त्याचा एक व्हिडिओ समोर आला आहे, ज्यातून तो वेगाने बरा होत असल्याचे दिसत आहे.

टीम इंडियाचा स्टार खेळाडू ऋषभ पंत पाच महिन्यांपूर्वी एका भीषण रस्ते अपघातात गंभीर जखमी झाला होता. या अपघातात त्याच्या शरीराला खूप गंभीर इजा झाल्या होत्या, पण आता तो वेगाने बरा होत आहे. सध्या त्याच्यावर बंगळुरू येथील राष्ट्रीय क्रिकेट अकादमीमध्ये उपचार सुरू आहेत. पंतने त्याच्या इंस्टाग्राम अकाउंटवरुन पायऱ्या चढतानाचा एक व्हिडीओ शेअर केला आहे. यात तो कोणाच्याही आधाराशिवाय पायऱ्या चढत आहे.









दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. –मुख्य संपादक

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अ‍ॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, मुख्य संपादक : देवदास मटाले. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com